# माणूस

२७ जुलै १९६८

चाळीस पैसे




भारत सरकारने वृत्तपत्रांच्या टपाल हशीलाचे दर वाढवून छोट्या वृत्तपत्रांवर जो प्राणघातक हल्ला केला आहे त्याबद्दल आम्ही निषेध व्यक्त करतो. ही दरवाढ रद्द करण्याची सुबुद्धी राजकर्त्यांना व्हावी यासाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांना जनतेने व लोकप्रतिनिधींनी साथ द्यावी असे आमचे आवाहन आहे.

# भारतीय स्वातंत्र्य गहाण पडत आहे

❋

तीनशे वर्षांपूर्वी इंग्रजांनी, फ्रेंचांनी, डचांनी, पोर्तुगिजांनी प्रथम येथे वखारी घातल्या. व्यापारउदीम वाढवला. हळूहळू येथील राजकारणात हस्तक्षेप सुरू केला. एकाला दुसऱ्याविरुद्ध मदती दिल्या. परस्परांत कलागती लावल्या. असलेले बेबनाव वाढवले आणि एक दिवस सगळ्यांनाच गुंडाळून आपले साम्राज्य येथे पक्के केले.

विशेषतः, इंग्रजांनी. कारण इतर पश्चिमी सत्तांचा हिंदुस्थानात तरी पराभव झालेला होता.

❋

# आज पुन्हा तीच गत

❋

सत्ता वेगळ्या आहेत. पण खेळ तोच.
वखारीच्या ऐवजी कारखाने आले, परकीय कर्जे आली. तैनाती फौजांऐवजी शस्त्रास्त्रांच्या मदती आल्या. सुशिक्षितांची तीच पश्चिमातुर, आशाळभूत नजर. विचारवंतांची तीच काळझोप.
राज्यकर्त्यांची, राजकारण्यांची तीच पेंढारी वृत्ती.
करोडो रुपये सालिना परदेशात चालले आहेत. देशाची मनुष्यसंपत्ती, साधनसामग्री लुटली, लुबाडली जात आहे.
सार्वभौमत्वाचा दिसामासांनी संकोच होत आहे.

❋

# को जागर्ति ? कोण जागा आहे ?

—या दृष्टिकोनातून संपादित होत असलेला
'माणूस' ऋणमुक्तता विशेषांक

❋

( कव्हर पान तीन पाहा )

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : नववा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## पत्रमैत्री

जुलै, १५

स. न.

आपल्या लोकप्रिय साप्ताहिकात 'ग्यानबाचं गुऱ्हाळ' हे सदर गल्या दोन अंकातून सुरू झालेले वाचनात आले. 'मुक्ताफळे' या सदराचे लेखक 'ग्यानबा' यांचेच हे गुऱ्हाळ आहे काय? शैलीतील तफावतीमुळे ही शंका आली आहे.

कळावे,
रामदास कामतीकर, सिंदखेड

आपली शंका बरोबर आहे.
सूज्ञास अधिक खुलासा न लगे.
—संपादक

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



# मला उमजलेले

रंगमंचावर फुलांच्या तोरणांच्या महिरपीत पार्श्वभागी दोन डोळे आपल्याकडे रोखून पाहत आहेत. एका डोळ्यात आरपार पाहणारी भेदक, संशयी नजर आहे; अनुभवांचा शीण आणि वृद्धत्वातली असहाय वेदना आहे. दुसऱ्या डोळ्यात निरागसता आहे, सौंदर्य आहे, आयुष्याविषयीची ओढ आणि कुतूहल आहे, भक्ती आणि प्रेम आहे, स्वप्ने आहेत. ही दोन रूपे दोन डोळ्यात एका वेळी वागविणारे विलक्षण व्यक्तिमत्त्व त्या खूप मोठाल्या, स्वच्छ छायाचित्राच्या रूपाने रंगमंच–नाटयगृहाचा आणि जमलेल्या श्रोतृसमुदायातील बहुतेकांच्या स्मृतींचा–व्यापून राहिले आहे.

हे बालगंधर्व.

खालीच रंगमंचावरील उच्चासनावर कुमार गंधर्व साथीदारांसमवेत त्यांना उमजलेले

रातराणी । रातराणी

*स्वकुलतारकसुता*

*कशि या त्यजु पदाला*

*सत्य वदे वचनाला*

*मम आत्मा गमला*

*दया छाया घे*

*नरवर कृष्णासमान*

# बाल गंधर्व

। विजय। तेंडुलकर।

बालगंधर्व– अशरीरी, स्वरबुंद, लयीने झपाटलेले एक चैतन्य सादर करण्यासाठी बसले आहेत. नेहमींच्या साथीत एक बदल आहे. पेटीऐवजी ऑर्गन आहे. ऑर्गनशिवाय बालगंधर्व नाहीत. आणखीही एक उणीव भासते आहे. सारंगी ही हवी होती. पण इथे कुमारांच्या स्वराला वसुंधराबाईंच्या गळयाची साथ आहे. नाटकात रंगमंचावर गायकाच्या गायनात स्वरांचा भराव जरूर तेथे करण्यासाठी ऑर्गनसोबत सारंगीसारखे एकादे वाद्य लागते. मुंबईतील या शिवजी मंदिराच्या रंगमंचावर आज नाटक नाही, गायनाची एक वेगळी मैफल आहे. शास्त्रोक्त संगीतातला एक प्रतिभाशाली उस्ताद नाट्यसंगीतातल्या उस्तादाची गायकी ऐकवणार आहे. या दुसऱ्या उस्तादाच्या गळयात म्हणे शास्त्रोक्त संगीताच्या

आदर्श उस्तादाची बावीसपकी एकवीस लक्षणे हजर होती आणि एकही दोष नव्हता. परंतु स्त्री वेषात तो रोज रात्री स्त्रीसुलभ विभ्रम करीत आणि लाडिक लाडिक संवाद बोलत आपली संगीत मैफल गाजवीत असे एवढ्यामुळेच त्याला गायक-नट मानण्यात आले आणि शास्त्रोक्त संगीतातल्या उस्तादाचे वाजवी विरुद त्याच्या कंठी कोणी अखेरपर्यंत लावलेच नाही. रंगमंचावरून हे सांगितले जात असता पार्श्वभागच्या उच्च स्थानावरून ते दोन डोळे प्रेक्षागारात तसेच एकटक पाहत असतात, एकाच वेळी वातड संशयाने आणि कोवळ्या कोवळ्या कुतूहलाने. एका डोळ्यात वेदना. दुसऱ्यात स्वप्न. मजा आहे.

आरंभ होतो स्वयंवरातल्या 'स्वकुलतारकसुता' ने.

नाट्य कुमार गंधर्वांच्या गायकीत अंगचेच आहे. पुढची 'जागा' आधी कळण अशक्य. प्रत्येक स्वर उत्स्फूर्त. प्रत्येक नवी तान, नवी हरकत हे गळा झोकून केलेले साहस. वरचा स्वर भरपूर आक्रमक आणि खुला. क्षणोक्षणी नवे अनपेक्षित अनुभव घेत-देत जाणारा हा जिद्दी गायक; नाट्यसंगीताला नवे रूप देण्याची ताकद याच्या गायकीत नक्कीच आहे. गंधर्वांच्या तथाकथित नकलांच्या तुलनेने हा प्रयोग उजवा वाटतो. टाळ्यांच्या गजरात 'स्वकुलतारकसुता' संपते. बालगंधर्वांचे हात-खंडा पद आणि चीजेच्या नव्हे तर पदाच्या अंगाने काहीशी सरळ साधी पण कुमार गंधर्वांचीच गायकी असा त्याचा परिणाम आहे. गंधर्वांची आठवण तर ही गायकी देतेच आह पण गंधर्वांची सहीसही नक्कल ती करू जात नाही हे फार बरे आहे. पदाच्या मर्यादित विस्ताराचे भानही तिला आहे; एरवी नाटकातले पद घेऊन त्याची चीज बनवून ती पिसत राहणारे शास्त्रोक गवई आहेतच.

## 'तात करि दुहिता'

पुढचे मानापमानमधले द्रुत लयीतले 'खरा तो प्रेमा' आणखी रंगते. यातही बालगंधर्वांच्या गायकीचे दडपण न घेता पण तिच्यातली नजाकत जागोजाग घेऊन कुमार गंधर्व आपल्या अंगानेच काही गंमत करतात. मुख्य म्हणजे मराठी शब्दोच्चाराची घाटणी बरीच निर्दोष, स्वच्छ आहे. शब्दांची हिसक्या हिसक्यांनी ओढाताण फारशी नाही. चीजेहून किंवा दोहे—भक्तिगीते यांहून स्वतंत्र प्रकाराने पदाची उभारणी, खुलावट घडते आहे. नाट्यसंगीताचा म्हणून मानला जाणारा अखंडित झपाटा त्यात नाही. 'नाथ हा माझा' आणखी रंगते. पदाच्या उतारावर पट्टीचा गायक—नट प्रेक्षकांवर काबू ठेवून एखाद्या सराईत मोटरवाल्याप्रमाणे क्रमशः वेग आणि विस्तार आवरीत अल्लद जाऊन संवादाला भिडतो; इथे बैठकीचा हा गायक काहीशा आकस्मिकपणेच पद संपवतो. त्याला या पदांची खुलावट जमते, तितकी अखेर जमत नाही असे वाटते. शिवाय मधूनच पदाची रंगत मंदावते. कदाचित् थकव्यान असेल. पण चीजेच्या गायनाचा सैलसरपणा इथे नकोसा वाटतो. पदाची रंगत संवादाच्या ओघात जाऊन बेमालूम मिसळण्याला तर इथे वावच नाही. पदा-

मागून पुन्हा दुसरे पदच. हेही एक अपुरेपण राहून जाते. नाटकातल्या पदांना स्वयंभू अस्तित्व निदान नाटयगृहाच्या रंगमंचावर तरी पटत नाही. बैठकीत हे कदाचित् चालेल. आता वेगळेच, जरा अनोळखी, अवघड पद येते. आशानिराशा नाटकातले 'तात करी दुहिता.' गंधर्वांचे असूनही सवंग नसल्याने हे आणखीच चांगले लागते. आमच्या मनात या विशिष्ट पदाशी बालगंधर्वांच्या गळ्याचे संदर्भ नाहीत; त्यामुळे फक्त कुमार या पदात समोर राहतात. आणि तरी बालगंधर्वांची आठवण हे पद देऊन जाते हे विशेष. आपल्या तडफदार, लवचीक, संवेदनाक्षम गायकीशी बाल गंधर्वांच्या नाटकी गायनाचा बराच चांगला आणि कल्पक मेळ या कलावंताने साधला आहे याची इथे खात्री पटते. टाळ्यांचा अधिक उत्साही गजर या पदावर होतो.

## झपाटलेले कुमार आणि श्रोते

नंतर स्वयंवरातले 'मम आत्मा गमला', एकच प्याला मधले 'दया छाया घे'' स्वयंवरातले 'नरवर कृष्णासमान', स्वयंवरातलेच 'सुजन कसा मन चोरी' ही पाठोपाठ आलेली पदे हा ग्रह दृढ करतात. 'दया छाया'चे तोंड तर हुबेहूब बाल-गंधर्वांच्या भावड्या आर्ततेने येते आणि प्रेक्षागृहातले गंधर्वभक्त क्षणैक हेलावून जातात. 'सुजन कसा'ची नाजूक हलकी फुलकी कलाकुसर वस्तुतः कुमार गंधर्वांच्या गायकीतही बसू शकणारी; पण तिची खुलावटदेखील त्या थोरल्या गंधर्वांच्याच गळ्याचे स्मरण जागवीत जाते. यातले काहीच त्या गंधर्वांचे हुबेहूब नव्हे, तरी मध्यंतरापर्यंत ध्यानी येते की बालगंधर्व नामक गायकीने आज पुन्हा एकदा चेटुक केले आहे–श्रोत्यांवर आणि मुख्यतः कुमार गंधर्वांवर. स्वतंत्र प्रज्ञेचा हा गायक मध्यंतरापर्यंत तितका स्वतंत्र प्रज्ञेचा राहिलेला नाही. तो बालगंधर्वांच्या कंठातल्या किमयेने स्वतःच आता खुळावू लागला आहे. ही गायकी मधूनच सही सही आपल्या गळ्यावाटे उमटवू लागला आहे. लयीचा पक्केपणा आणि स्वराचा सच्चेपणा दोघांतही सामायिक. त्या गंधर्वांच्या आवाजातला नंतर नंतरचा नाटकी ढालेपण आणि दमछाक इथे पूर्णतया उणी आहे. रंगमंचावर तान भिरभिरते पण झळाळत

---



प्रेक्षागृहातून जात नाही. स्वर खूप गोड लागतो आणि चपळाईने फिरतो पण तो 'त्या' स्वराइतका तेज नाही. रोज रात्री रंगमंचावरून सहा सहा तास श्रोत्यांना झुलवणाऱ्या 'त्या' गंधर्वांचा पल्ला या गंधर्वापाशी नाही; कारण ती तपश्चर्या याला करावी लागलेली नाही. याची तपस्या चोखंदळांच्या बैठकीतली आहे.

मध्यंतरानंतर स्वयंवरातले धीमे 'प्रेम नच जाई' संपते आणि 'कशी या त्यजू पदाला' या पदाला मागल्या भव्य, अवजड प्रतिमेतले बाल गंधर्व जणू खाली उतरून बैठक ताब्यात घेतात. पाठोपाठचे 'सत्य वदे वचनाला' त्यामागून 'नयने लाजवीत,' नंतरचे 'करित यदुमनी' ही सारी त्या गंधर्वांची पेटंट पदे. समोरचे कुमार गंधर्व बालगंधर्वांच्या स्वरसृष्टीत भ्रमतात, हरवतात. त्या प्रतिमेत ही नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा विरघळते. कुमारांच्या कंठातून, त्या कंठाच्या मर्यादा आणि सामर्थ्यानिशी जणू बालगंधर्वच गातात. मैफलीच्या प्रथमार्धात पुरेशा उत्साहात नसलेल्या बहुसंख्य गंधर्व-भक्त श्रोत्यांना आता उधाण येते. नाटचगृहात खऱ्या अर्थाने गंधर्वसंगीत निनादू लागते. 'कशि या त्यजू' ला तर वन्समोअर मिळतो आणि या पद्धतीची सवय नसलेला, बैठकीतला हा गायक, अस्सल नाटकी गायकाच्या खुषीने आणि तत्परतेने श्रोत्यांची ही मागणी पुरवून त्या पदाचा नव्याने परंतु मर्यादित विस्तार करून पसंतीच्या टाळ्यांचा कडकडाट स्मितमुखाने स्वीकारतो. गंधर्वांच्या हुकमी 'जागा'—त्यांच्या ध्वनिमुद्रणातून ऐकायला मिळणाऱ्या—तितक्याच हुकमीपणे या गंधर्वांच्या कंठावाटे आता स्फुरत आहेत. हुबेहूब तरीही खूप रसरशीत गोडव्याने. नक्कलच, पण निर्जीव नव्हे; मुळाइतकीच चैतन्यमय; तशीच प्रेक्षागृह काबीज आणि घायाळ करणारी. रंगमंचावरच्या पार्श्वभागी, उंच जागी टांगलेला तो वृद्ध चेहरा आता जणू विजयी मुद्रेने उचंबळत 'मायबापा, ही संधी पुन्हा लाभेल असं वाटलं नव्हतं, वाटलं नव्हतं बरं,' असे काही म्हणू पाहतो आहेसे भासते. तोच तेवढा जिवंत वाटतो, बाकी सारा भास! तोच सर्वव्यापी वाटतो, बाकी केवळ त्याच्या हातची कळसूत्री बाहुली. बालगंधर्व जाऊनही उरले, हे असे साक्षात खरे होते. भैरवी येते, 'नच मानसा, आशा'—नंदकुमार नाटकातली. 'त्या' कंठातली अपार अभिनयसंपन्न आर्तता या सच्च्या कंठात आता दाटदाटून आली आहे. स्वर एका वेदनेत भिजला आहे. फार छान वाटते. फार व्याकूळ वाटते. कान सुखावत आहेत, काळीज दुखते आहे. लगेच या उदास भैरवीतून 'प्रभु आजि गमला' ही आनंदमय भरवी एका साहजिकपणे उमलते; आतआतून आनंदाचे झरे स्रवू, पाझरू लागतात. मैफल संपते तेव्हा दोन गंधर्वांतला भेद मनीमानसीही राहिलेला नसतो. शेवटी सर्व गंधर्व ही चिरंतन वेदना आणि हा अनादी अनंत आनंद गाण्यासाठीच तर पृथ्वीवर उतरत असतात.

खरी ही वेदना, हा आनंद.

बस्स्!

O

# कविता

## निळ्याशार पापण्यांत

वैफल्याच्या ज्वालांमध्ये अनामिक खोळंबला आहे
निळ्याशार पापण्यांत एक अश्रू ओथंबला आहे
पत्थराच्या हृदयात मृगजळाचा भास आहे
पेटलेल्या प्रीतिमंदिरात चंदनाचा वास आहे...
निराशेच्या काळोखात भग्न जीव गात आहे
भयाणतेच्या निर्जिवतेत स्मृतिपिसांची साथ आहे
काजळलेल्या प्रतिमेत भकास दंवबिंदु आहे...
गगनाच्या सांदीकोपऱ्यांत वेडा दुगी इंदु आहे...
ज्वालामुखीच्या उद्रेकात कोकिळ मूक झाला आहे
अंतरीच्या वेदनांनी जिवंतपणीच मृत झाला आहे
व्याकुळलेल्या व्यथांनी कासावीस झाला आहे
निळ्याशार पापण्यांत एक अश्रू ओथंबला आहे...
वैफल्याच्या ज्वालांमध्य अनामिक खोळंबला आहे
निळ्याशार पापण्यांत एक अश्रू ओथंबला आहे !

— *अनिल देवधर*

## सांग अहिल्ये....


सांग अहिल्ये, मुळीच नसता...
तुझा काही अपराध
हवा कशाला होता तुजला...
पतिकडून उःशाप ?
ज्या रामाने पदस्पर्शाने...
तुजला उद्धरिले
सति सीतेला तयानेच मग...
का ग त्यागियले ?
उद्धरिले तुज दगडामधुनी...
परमात्मा म्हणुनी
घरणी भङ्गुनी सीता जाता...
स्वस्थ कसा बसुनी ?
सांग अहिल्ये खरेच का गे...
उःशाप तुझा संपला ?
स्त्री जातीचा दुःखभोग का
कायमचा सरला ?
हाय ! अहिल्ये दगड तुझा मी...
पांघरला असता
बोल ! कुठे तू त्यजुनी गेलीस...
शिळा शाप भ्रष्टा ?
उःशापाची भीक धऊनी...
उद्धरुनी गेलीस
ललनेची परि ललाटरेषा...
नाही पुसलीस

—शाकंभरि

## पापपुण्य–

आकाशाच्या भाळावर
अंधाराचा टिळा
म्हणूनच झाली त्या
अहिल्येची शिळा ! ...
पुण्य जरि सांचलेले
अगदी आकंठ
इंद्राच्या पुण्याला
फुटले पापाचे कंठ ! ...
दशरथ राजाने जेव्हा
वेधिले श्रावणाला
तेव्हांच लाभला
जन्म श्रीरामाला !
पुण्याच्या वाढीला
पापाचे कलम
तेव्हाच बोलते
जीवन "स–र–ग–म"

—दत्ता सावन्त





## अशाच कातरवेळी

भिरभिरून वाहे वारा
शहारून येते ऊर
अन् अशाच कातरवेळी
लागते जिवा हुरहूर .. ..

स्वप्नाळू डोळ्यांमध्ये
जागते काजळी रात
थरथरत्या अधरांवरती
अस्फुटही नूरले स्मीत

गंभीर अबोला घुमतो
हृदयाच्या गाभाऱ्यात
ही सतार मनिची, खोल
छेडते भैरवी गीत !

दशदिशास ये अंधारी
दिसते नच पाउलवाट
अन् अशाच कातरवेळी
गूढांत गोठते प्रीत...... !

— *शशिकांत फडणीस*


## पाप

पापाचे रांजण भरते वेळी
मी नव्हतो वाल्या कोळी
खडा टाकता मोजीत होतो—
नाव तुझे वनमाळी

वाल्याचा वाल्मिकी झाला
रामही नव्हता त्यावेळी
रामासुद्धा झालो वाल्या—
करणी ती कैसी काळी

वाल्याच्या रांजणांत होते
तुजविण पाप तेवढे
मी तर भरले तुझ्या डोईवर
पापाचेच घडे

— *राजीव*



# आस्वाद

" जेयांचिया वाचे माझे आलाप । दीठि भोगी माझें चि रूप ।
जेयांचें मन संकल्प । माझे चि वाहें ।।१।।
माझेया कीर्त्तीविण । जेयांचे रीते नाहीं श्रवण ।
जेयां सर्वांगा भूषण । माझी सेवा ।।२।।
जेयांचें ज्ञान विषो नेणें । जाणिवा मज चि एकातें जाणे ।
जेयांसि ऐसें लाभे तरी जिणें । यन्हवीं मरण ।।३।।
ऐसां आवंवां चि परीं पांडवा । जिहिं आपुलेया सर्वभावां ।
जियावेयालागि ओलावा । मीं चि केला ।।४।।
ते पापयोनी हीं होंतु का । ते श्रुताधीत न्हवतु कां ।
परि मातें तूकिता तूंका । तूटि नाहि ।।५।। " — *ज्ञानेश्वरी*

कायावाचामने ईश्वराची एकनिष्ठ भक्ती करणाऱ्यांचे वर्णन आणि माहात्म्य या ओव्यांमध्ये ज्ञानेश्वरांनी सांगितलेले आहे.

सर्वभावाने ईश्वरचरणी रत झालेल्या भक्तांचे सारे जीवनच ईश्वरमय झालेले असते. त्यांची वाणी ईश्वराचेच आलाप गात असते. गुणगान करीत असते. दृष्टी केवळ ईश्वराच्या रूपावरच खिळलेली राहते. तेच एक रूप ती भोगत राहते. फार काय, त्यांच्या मनात विचारसुद्धा या एका ईश्वराचेच येतात. " जेयांचे मन संकल्प । माझेचि वाहे " अन्य विचारांना, क्षुद्र भावनांना त्यांच्या ठायी थारा नसतो. त्यांचे कान कधी रिकामे नसतात. नेहमी ईश्वराची कीर्ती ऐकण्यात, त्याच्या गुणगानाचे श्रवण करण्यात मग्न असतात. गुंतलेले राहतात. ईश्वराची निरंतर सेवा करणे हे त्यांच्या सर्वांगाचे एकमेव आणि अभिमानाचे भूषण असते. अशा तऱ्हेने त्यांची सर्व ज्ञानेंद्रिये ईश्वराने, ईश्वरभक्तीने भारलेली असतात. भाषण, ईक्षण, श्रवण—फार काय, मनातील विचारही याच एका नादाने दंग झालेले असतात. मागोमागच कर्मेंद्रियांची सर्व कर्मेही ईश्वराच्या सेवेसाठीच घडत राहतात हे सयुक्तिकच.

बौद्धिक, वैचारिक आणि भावनिक पातळीवरही ईश्वराच्या या नितांत भक्तांना अन्य कसलेही व्यवधान नसते. त्यांच्या ज्ञानाला विषय माहीत नसतो. भौतिकतेची, ऐहिक सुखदुःखांची मर्यादा त्याला स्पर्शही करू शकत नाही. साऱ्या जाणिवा ईश्वरापाशी एकवटलेल्या असतात. फक्त एक परमेश्वरच त्यांना दिसत असतो, भासत असतो, जाणवत राहतो. असे भक्तिमय जीवन जगावयास मिळाले तर ते

अर्थपूर्णतेने जगू शकतात. एरवी त्यांना ते मरणप्राय वाटते. ईश्वराविना जगणे ही कल्पना त्यांच्या जीवनाच्या शक्यतेच्या कोटीत बसत नाही. अशा तऱ्हेने त्यांनी आपल्या सर्वभावाने केवळ ईश्वर हाच जगण्यासाठी ओलावा केलेला असतो. त्या ईश्वराविना त्यांचे जीवन म्हणजे रखरखीत, शुष्क, वैराण वाळवंट असते.

असे जे एकनिष्ठ भक्त असतील, त्यांनी अशा तऱ्हेने आचार, विचार आणि उच्चार – सारे काही ईश्वरमय करून टाकलेले असेल, ईश्वर हाच ज्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू असेल त्यांची योग्यता कितीतरी उंचावते. आकाशाला जाऊन भिडते ते प्रत्यक्ष परमेश्वरच होतात. देवाच्या देवघरात जाऊन बसतात. 'मासि तूंकिता तूंका । तूटि नाही '– माझ्याशी त्यांची तुलना केली असताही ते कमी भरत नाहीत, प्रत्यक्ष माझ्याइतके ते श्रेष्ठ होतात. असे प्रत्यक्ष भगवंत अशा भक्तांविषयी अभिमानाने सांगतात. मग या गाढ भक्तांचे पूर्वायुष्य कसेही बरबटलेले असो. कुठल्याही हीन, नीच, अमंगल, पापी उद्गमातून त्यांचा जन्म झालेला असो. त्यांनी धर्मज्ञान, तत्त्वविचार, तत्त्वज्ञान – काही काही मिळविलेले असण्याची जरुरी नाही. पापयोनीत जन्मलेले आणि श्रुताधीत नसलेलेही जीव एका भक्तीच्या जोरावर अशा तऱ्हेने ईशपदी जाऊन बसतात.

या पाच ओव्यांमध्ये सगळ्या भक्तियोगाला ज्ञानेश्वरांनी रेखांकित केले आहे. भक्तियोग्याचे स्वरूप, कार्य आणि माहात्म्य या सर्वांचे एक सुस्पष्ट चित्र येथे उमटले आहे. भक्तीच्या बळावर भगवंत मिळविणाऱ्या या साधकाचे वर्णन ज्ञानेंद्रिये–कर्मेंद्रिये – मन-बुद्धी – जाणिवा अशा चढत्या क्रमाने करून शेवटी त्यांच्या जीवनाचा अवघा केंद्रबिंदू एक ईश्वरच असल्याचे सांगितले आहे. तीव्रतेची, उत्कटतेची वर्तुळे संपृक्त होत होत तिथे एकवटलेली दिसतात. उलटपक्षी या वर्तुळांच्या परिघकक्षा मात्र पार अनंतापर्यंत विस्तारत जातात. प्रत्यक्ष ईशपदाला स्पर्श करतात.

ज्ञानेश्वरांच्या काळाच्या सामाजिक पार्श्वभूमीवर पाहिले असता जनसामन्यांना आणि पददलितांना केवढा दिलासा येथे भक्तिमार्गाने दिलेला आहे याची कल्पना येते. ज्या काळात जातिवर्णांच्या भिंती धार्मिक प्रतिष्ठेच्या आड उभ्या होत्या, स्वतः ज्ञानेश्वरांना जेथे बालपणी 'संन्याशाची मुले' म्हणून उपेक्षेचे नि अवहेलनेचे कटू जहर सहन करावे लागले होते, केवळ उपनिषदांच्या नि वेदांच्या ऋचा घडाघडा म्हणून दाखवणे ही पांडित्याची आणि धर्मज्ञतेची कसोटी मानली जात होती, त्या काळात ज्ञानेश्वर सांगतात : "ते पापयोनी हीं होंतु कां । ते श्रुताधीन न्हवतु कां : परि मासि तूंकिता तूंका । तूटि नाहिं ।।" – समाजाच्या विषमतेचे काळे चित्र नजरेसमोर आणले म्हणजे 'पापयोनी' व 'श्रुताधीत न्हवतु' या पदबंधांच्या अर्थरेषा आणखी धारदार वाटतात. झगझगून उठतात. – रसिक.

---

**विशो = विषय; ऐहिक वा भौतिक सुखदुःखांचा विचार.**
**श्रुताधीत = धर्मज्ञान मिळविलेले; तूंकिता = तुलना केली असता.**



# ग्यानबाचं गुऱ्हाळ

## विठोबाच्या नावावर हरताळ

या देशाला काय झाले आहे हेच कळेनासे झाले आहे. काय वाटेल ते घडत आहे. कशाचा काही अर्थच लागत नाही. परवाची हकीकत कळली ना तुम्हाला? आषाढी एकादशीच्या दिवशी मुंबईतल्या प्राथमिक शाळांना सुटी नव्हती. त्या चालू होत्या. पण एकादशीची सुटी कशी नाही म्हणून मुलांनीच हरताळ पाळला आणि सुटी घेतली. आता काय करावे? याच्यापेक्षा भयंकर गोष्ट म्हणजे गिरण्यांनासुद्धा सुट्या होत्या. त्यामुळे हजारो कामगारमंडळी वडाळ्याच्या विठोबाच्या दर्शनास गेली होती. शाळेतल्या विद्यार्थ्यांनी तर दिंड्याच काढल्या होत्या म्हणे.

मुंबईतली ही गोष्ट कोणाच्याही मनात चिंता उत्पन्न करील अशीच आहे. शाळेतली लहान लहान मुले ती काय, अन् आषाढी एकादशीला सुटी नाही म्हणून ती हरताळ पाडतात काय, सगळाच प्रकार मन विषण्ण करणारा आहे. एकादशी हा काय राष्ट्रीय उत्सव आहे? स्वातंत्र्य–दिन, प्रजासत्ताक दिन, बापूजींची जयंती या दिवशी मुलांनी सुटी घेतली तर गोष्ट वेगळी. निदान अल्पसंख्यांकांच्या आनंदाचा दिवस असता तरी हरकत नाही. रमझान–ईद, बकरीद, मोहरम, खुर्दाद साल, गुड-फ्रायडे, नाताळ असला काही सण महोत्सव आहे आणि त्या दिवशी शाळा चालू आहेत म्हटले तर कबूल आहे. खुशाल हरताळ पाडावा आणि सुटी घ्यावी. पण एकादशीची सुटी? भलतेच काहीतरी! असेल, तो पंढरपूरच्या विठोबाच्या यात्रेचा दिवस असेल. त्या वारीला लाखो लोक पायी चालत जात असतील. पण म्हणून काय झाले?

हिंदूंच्या एका सर्वसामान्य यात्रेसाठी सगळ्या शाळांनी हरताळ पाळून सुटी घ्यावी म्हणजे काय? शाळेच्या अधिकाऱ्यांनी अगदी बरोबर गोष्ट केली होती. वडाळ्याच्या विठोबाला कितीही गर्दी लोटत असली आणि त्या यात्रेत अनेक गोष्टी प्रेक्षणीय असल्या तरी मुलांना सुटी देणे बरोबर नाहीच. अशाने मुलांच्या मनावर भलतेच संस्कार होतील! होतील कशाला, झालेच आहेत. मुलांनी चक्क दिंड्या काढल्या होत्या म्हणे! छान! 'ग्यानबा तुकाराम' आणि 'विठोबा–रखुमाई' असा नाद-घोषसुद्धा या कारट्यांनी केला असेल. पालखी नेली असेल. नाचले असतील, आरोळ्या ठोकल्या असतील... छेः छेः! नुसत्या कल्पनेनेही माझ्यासारख्या 'सेक्यूलर' माण-

साऱ्या अंगावर काटा उभा राहतो. कार्टी बिघडली हेच खरे. पण जिथं कामगारांची टाळकी फिरली तिथं पोरांची बिचाऱ्यांची कथा काय ! आज नाही म्हटले तरी चाळीस पन्नास वर्षे झाली असतील ! मुंबईतल्या कामगारांवर साम्यवादाच्या अमृताची संतत धार भाईमंडळींकडून चालू आहे. पण कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच ! परवा याच कामगारांनी कम्युनिस्टांचा बोऱ्या वाजवला आणि खुशाल शिवसेनेला निवडून दिले. देवाधर्माविरुद्ध इतकी वर्षे प्रवचने ऐकून ऐकून पुन्हा कामगार आपले वडाळ्याच्या विठोबाला जातातच आहेत. हाय हाय ! 'हेची फळ काय मम तपाला ?'

मुंबईतल्या प्राथमिक, माध्यमिक ज्या कुठल्या शाळा असतील त्यांच्या व्यवस्थापकांनी आता मुळीच गप्प बसू नये. कुणीकुणी हरताळ पाडला, याची त्यांनी सक्त चौकशी करावी. कोण कोण वडाळ्याला गेले होते आणि दिंडीत कुणीकुणी भाग घेतला होता ती पोरे हुडकून काढावी. शाळेला बुट्टी मारून असले काही ते अराष्ट्रीय धंदे केल्याबद्दल त्यांना मास्तरांनी चांगले चोपून काढावे. सध्या छडी वापरायला शाळेत परवानगी आहे की नाही ? नसली तर शाळाखात्याकडून तात्पुरती काढा. पण ही पोरे बडवा. त्याशिवाय त्यांना अकला येणार नाहीत. पुढच्या आषाढी एकादशीच्या वेळेला एक पोर बाहेर सोडू नका. वाटल्यास दशमीच्या दिवशी आधीच आदल्या रात्री त्यांना शाळेत कोंडून ठेवण्यात यावे आणि द्वादशीच्या दिवशीच् शाळा सुटल्यावर घरी पाठवावे. म्हणजे हा गोंधळ पुन्हा होणार नाही. मुंबईतल पालक समंजस आहेत. ते या गोष्टीला मुळीच हरकत घेणार नाहीत अशी माझी खात्री आहे.

## ☐ सुश्रूत आणि प्लॅस्टिक सर्जरी

आपले महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. चेरियन हे डॉक्टर आहेत. परवा प्लॅस्टिक सर्जरी करणाऱ्या शल्यविशारदांच्या तिसऱ्या अखिल भारतीय अधिवेशनाचे त्यांनी उद्घाटन केले. त्या वेळी बोलताना त्यांनी एक नवी माहिती सांगितली. 'प्लॅस्टिक सर्जरी' ही गोष्ट हिंदुस्थानला काही नवी नाही असे ते म्हणाले. आज हे तंत्र आपण आधुनिक मानतो. पण प्राचीन काळी भारतात हे शास्त्र अवगत होते. इ. स. पूर्वी ६०० वर्षे या काळात सुश्रूत या प्रसिद्ध भीषग्वर्याने ही शस्त्रक्रिया केली होती असा पुरावा आहे. अगदी अलीकडे १७९२ मध्ये पुण्यात साताऱ्याच्या एका माणसाने प्लॅस्टिकची पहिली शस्त्रक्रिया केली अशी नोंद आहे. पुढे ही कला लोप पावली आणि पहिल्या महायुद्धानंतर पुन्हा जगभर या प्रकाराचा अभ्यास सुरू झाला असे डॉक्टर चेरियन यानी सांगितले.

चेरियनसाहेबांनी दिलेली ही माहिती वाचून मी खरेच अगदी गंभीर झालो. आमच्याकडे पूर्वी काय होते आणि काय नव्हते, याची इतकी काही नवी माहिती

बाहेर पडू लागली आहे, की त्यातले खरे कोणते आणि खोटे कोणते याचा काही पत्ताच लागत नाही. रामायण-काळात विमाने होती म्हणतात. 'पुष्पक' विमानात बसून रामसीता परत अयोध्येला आले असे आपण चक्क रामायणात वाचतो. या पुष्पक विमानाचे पुढे काय झाले? ते राम-लक्ष्मणांनी पुढे का वापरले नाही? निदान लव-कुशानी तरी त्याचा काही उययोग करावा? पण तेही दिसत नाही. (राज्यकर्ता म्हणायचे आणि एकदासुद्धा विमानप्रवास करायचा नाही—याला काही अर्थ आहे का? पण ते असो.) हे विमान पुढे नाही, नाही ते नाहीच! थेट तुकाराममहाराजांच्या प्रयाणाच्या वेळीच ते उगवले, आज आपण चित्रात पाहतो तेच हे विमान. हे विमान वैकुंठाहून तुकाराममहाराजांना नेण्यासाठी खास आले अशी दंतकथा आहे. याही विमानाचे पुढे झाले काय? पुन्हा ते कुणालाही नेण्यासाठी आलेले दिसत नाही. काही असो. 'विमान' हा शब्द निदान आम्हाला माहीत होता एवढे खरे. कदाचित आमच्या पूर्वजांच्या प्रतिभेचा केवळ तो एक काव्यमय आविष्कार असेल. कुणीतरी विद्वानाने वेदात विमानविद्या आहे हे सिद्ध केले आहे असे म्हणतात. वेद सध्या आपण कुणीच वाचीत नसल्यामुळे त्यात काय आहे आणि काय नाही हे कळायला मार्ग नाही. पण कसलाही नवीन शोध लागला की हे सगळं वेदात आहे असं सांगण्याची लाटच मध्यंतरी आली होती. त्यामुळं वेदांचा कुणी हवाला दिला की मला तरी घसकाच बसतो. सोवळ्यात वीज आहे, शेंडीत इलेक्ट्रिसिटी असते असेही मागे काही काही महानुभाव सांगत असत. आचार्य अत्रे यांनी मात्र शेंडीत वीज असल्याचे कबूल केले आहे. आपल्या आत्मचरित्रात त्यांनी लिहिले आहे—"बाकी शेंडीत वीज असते ही गोष्ट मात्र खरी असली पाहिजे. कारण मी जेव्हां पहिल्यांदा शेंडी काढून टाकली तेव्हा माझ्या वडिलांना जोराचा धक्का बसला!..."

महाभारतात कर्णाला कवचकुंडले उपजतच असल्याचा उल्लेख आहे. ही कवच-कुंडले ब्राह्मणाच्या वेषात आलेल्या इंद्राने मागितली आणि दानशूर कर्णाने ती फारसा विचार न करता देऊन टाकली अशी कथा आहे. अलीकडेच एका कादंबरी-काराने कर्णाच्या जीवनावर कादंबरी लिहून ही कवचकुंडले खरोखरीच असली पाहिजेत असा सिद्धान्त—अलीकडचे काही निसर्गाचे चमत्कार सांगून—मांडला आहे. अशी अलीकडची उदाहरणे देऊन मागचे सिद्ध करायच्या खटपटीत आपण बसलो तर मग काही बघायलाच नको. कोणातरी ऋषीचे कुंभात वीर्य सांडले आणि तेथे त्याचा पुत्र निर्माण झाला म्हणतात. यावरून 'टेस्ट ट्यूब बेबीज'चा शोध हा महाभारतात होता असे स्पष्ट दिसते नाही का? मारुतीने सूर्यमंडळापर्यंत झेप घेतली ही गोष्ट आपण (हनुमान जयंतीच्या दिवशी) नेहमी ऐकतो. पण त्याचा अर्थ तुम्हांला कळला का? हनुमंताने सूर्याकडे उड्डाण करणाऱ्या रॉकेटचा शोध लावला होता, पण त्यात त्याला थोडे अपयश आले, इतकेच. अगस्ती ऋषींनी एका

आचमनात समुद्र पिऊन टाकला. याचा अर्थ समुद्र हटवून तेथे वसाहत करण्याची बॅक वे रेक्लमेशन का काय म्हणतात ते – मूळ कल्पना प्राचीन हे अगदी स्पष्ट दिसते......

जाऊ द्या. वाचकहो, आपल्या जुन्या भानगडी इतक्या अनंत आहेत की हल्लीचे नवीन काहीतरी त्यात सापडायचेच. सगळेच तसे असेल असे कसे बोलावे? प्लॅस्टिक सर्जरी फार प्राचीन काळी या देशात असेलही, नाही म्हणून माझ्यासारख्या अडाणी माणसाने कसे म्हणावे? वाईट एवढेच वाटते की, रामायणकाळात ही विद्या अवगत नव्हती. नाहीतर शूर्पणखेचे कापलेले नाक रावणाने नक्कीच दुरुस्त केले असते!

## □ नम्र सूचना


मराठवाडा मागासलेला आहे हा आपला समज किती खोटा आहे बरं! त्या भागात अजून पुरेसे रस्ते नसतील, वीजपुरवठा कमी असेल, पाटबंधारेही कमी असतील पण लोकांची बुद्धी काही मागासलेली नाही हे नक्की. बाकीच्या महाराष्ट्रात बुद्धिमत्तेचा आविष्कार जितक्या प्रकर्षाने प्रकट होतो तितकाच मराठवाड्यातही होतो. आता परवाचीच गोष्ट घ्या. तेथील प्राध्यापकांच्या नौकरीच्या नियमात एक मोठी स्वागतार्ह सुधारणा होणार आहे. मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीने नुकताच असा ठराव संमत केला आहे की, कोणत्याही महाविद्यालयातील प्राध्यापकाला कोणतेही कारण न देता – नुसती कुलगुरूंची पूर्वसंमती घेऊन – केव्हाही काढून टाकता येईल. मग त्यांची संस्थेतली सेवा कितीही झालेली असो. आठ वर्षांच्या आतली असेल तर त्याला सहा महिन्याचा पगार द्यायचा. आठपेक्षा जास्त 'सर्व्हिस' असेल तर एक सबंध वर्षाचा पगार त्याच्या तोंडावर फेकावा. पण नोकरीवरून का काढून टाकले याचे कारण सांगण्याची संस्थेला गरज नाही. प्राध्यापकाला तशी कोणतीही तक्रार करता येणार नाही.

ही माहिती कळली आणि मला मोठा आनंद वाटला. प्राध्यापकवर्ग दिवसेदिवस मस्तवाल होत चालला आहे हे माझ्या कानावर होतेच. त्यांना कुणीतरी वठणीवर आणले पाहिजे असे वाटतच होते. [ऐन उन्हाळ्यात सगळे लोक कामाच्या ओझ्याखाली गुदमरून जात असतात तेव्हा हे लोक खुशाल तीन महिने सुटी घेऊन चैन करीत खुशालचेंडूसारखे हिंडत असतात. आमच्यासारख्यांच्या पोटात यामुळे किती कळ उठते हे त्यांना कसे कळणार?] मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीने हा खासा उपाय शोधून काढला. प्राध्यापकांच्या डोक्यावर कशी नेहमी टांगती तलवार पाहिजे. तरच ते पोरांना धडपणे शिकवतील. नाहीतर आपल्या मोकळ्या वेळेचा उपयोग नसत्या उचापती करण्यात ते घालवतील, हे अगदी उघड आहे. आज पाहा ना. पुण्यामुंबईत कितीतरी प्राध्यापक प्रत्यक्ष राजकारणात भाग घेत आहेत. मी म्हणतो घेताहेत तर घेऊ द्या. पण निदान कॉंग्रेसच्या राजकारणात तरी भाग घ्या.

अरे, किती झाले तरी राज्य त्यांचे आहे. आणि बुद्धिमान माणसांचा त्यांना अलीकडे तुटवडाच आहे. पण तसे होत नाही. राजकारणात पडतात ते पडतात आणि विरोधी पक्षात सामील होतात. हा काय फाजीलपणा आहे ? अशा प्राध्यापकांना खरोखरीच कसलेही कारण न सांगता काढून टाकले पाहिजे. त्याची चौकशी कशाला पाहिजे ?

काढून टाकलेल्या प्राध्यापकांना सहा महिन्यांचा पगार अन् एक वर्षाचा पगार द्यावा, हे प्रकरण मात्र आपल्याला काही समजले नाही. असल्या लाडानेच हे लोक शेफारतात हे संस्था-चालकांच्या लक्षात कसे येत नाही ? पगार बिगार काही देऊ नका. खुशाल त्यांची बायकापोरे उघड्यावर पडू द्या. ह्यांच्या दाराशी देणेकऱ्यांच्या रांगा लागू द्या. तरच यांचे डोळे उघडतील. मी तर म्हणतो, याच्यापेक्षा सेवेचे नियम कडक केले पाहिजेत. प्रत्येक वर्षी प्राध्यापकाने गावातील काँग्रेस-पुढाऱ्याकडून 'कॅरेक्टर सर्टिफिकेट' आणले पाहिजे असा पहिला नियम असावा. तसेच गावातील गुंड आणि पोलीस यांच्याही प्राध्यापकांच्या वर्तनाबद्दल शिफारशी असल्या तर उत्तम! प्रत्येक सरकारी सार्वजनिक वाहनात जसे एक तक्रार पुस्तक असते तसे प्रत्येक प्राध्यापकांबाबत एकेक तक्रार पुस्तक असावे आणि ते ग्रंथालयात ठेवण्यात यावे. कॉलेजामधील कोणत्याही पोराने या पुस्तकात आपल्या तक्रारी लिहाव्यात. मात्र सरकारी तक्रार-पुस्तकातील तक्रारींचा काहीच उपयोग होत नाही तसे होऊ नये. प्राध्यापकाबाबतच्या या तक्रारींचा गंभीरपणे विचार व्हावा. सध्याच्या राजवटीविरुद्ध असंतोष उत्पन्न होईल अशा तऱ्हेचे उद्गार त्याने वर्गात काढले असे नुसते समजले तरी प्राचार्यांनी त्याची गंभीर दखल घ्यावी. मुलांना छड्या मारण्यास परवानगी नसेल. पण प्राचार्यांनी प्राध्यापकांना छड्या मारण्यास काही परवानगी लागत नाही ना ? मग झाले तर ! या छडीचा प्रसाद सर्व मुलांदेखत देण्यात यावा. म्हणजे प्राध्यापकांना चांगलीच जरब बसेल. या शिवाय आणखीही एक नियय असा करण्यात यावा की, प्राध्यापकाने घराबाहेर पडल्यापासून घरी परत येईपर्यंत बाहेर सर्वत्र मान खाली घालून चालावे. एखाद्या कुलशीलवान स्त्रीला ज्या मर्यादा पाळाव्या लागतात त्या त्यानेहि पाळाव्यात असे बंधन असलेच पाहिजे. वर्गात शिकवताना सुद्धा त्याने अत्यंत मर्यादेने, हळूवार स्वरात किंचित लाजत-लाजतच बोलावे, असाही नियम करण्यात यावा. कठोर, घनगंभीर, उत्कट आणि भावनापूर्ण स्वरात त्याने कधीही भाषण करता उपयोगी नाही. असे बोलल्यास संस्था-चालकांचा विनयभंग झाला असे समजून त्याला दम देण्यात यावा. एखादा प्राध्यापक असल्या फालतू गोष्टीमुळे विद्यार्थ्यात 'लोकप्रिय' झाला आहे असे आढळून आल्यास त्याला तात्काळ दंड करण्यात यावा. असो. या काही नम्र सूचना. मराठवाडा विद्यापीठातील बुद्धिमान मंडळी याचा विचार करतीलच.

O



चौथी सचित्र आवृती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन
पुणे

उषा गोडबोले


# आमचेही हैदराबाद!

“ इतक्या उकाड्याचं ? आणि हैद्राबादला ?” काय येड की खूळ अशा थाटात अनेकजण प्रश्न विचारत होते. आम्हालाही आमच्या या उन्हाळी ट्रीपचं हसू येत होतं. पण जाणार होतो हे नक्की…गेलोही.

पहिला हॉल्ट पंढरपूरला. आधी विठोबा नि मग पोटोबा करून सोलापूरच्या वाटेला लागलो. गटागटा ऊन पिणारा टार रोड. बेफाम वारं पिणारी गाडी. विविधभारतीच्या तालावर हिंदकळणारी पेंग. भरली पोटं नि रिकामी मनं. यमुनातीरी पाण्याला जाणाऱ्या गोपीकटीवरील घटांसारखी उत्सुक रिकामी. रस्ता फार लवकर संपला.

सोलापूरचा मुक्काम केवळ नावापुरता. दमलेलो नव्हतोच म्हणून विश्रांतीचा प्रश्न नव्हता. पण रात्री अंधारात गाडी चालायची नाही म्हणून एक रात्र तंबू ठोकला. प्रवासाची झिंग जरा डोकावत होती. न रांधता खातपीत होतो. पैसे टाकून आराम विकत घेत होतो. त्याचीही एक चव होती–हिमा मटारसारखी !

प्रवासाच्या आनंदाचा रसरशीत भुरका मारला तो हैदराबादला. उमरगा, नळदुर्ग, हुमणाबाद–कधीही न ऐकलेल्या गावांवरून ‘ बस् एकही नजर ’ टाकत पळत होतो. जाता जाता सिकंदराबाद लागलं. दादर आल्यावर व्ही. टी. ला काय देर ? पण आम्ही आपले चाललोय चाललोय पण सिकंदराबाद संपायचे नाव नाही. जो समोर सापडेल त्याला आम्ही विचारावं. ‘ भई काचीगुडा किधर हय ?’ ‘ इधरसे



सीधा ' हे सगळ्यांनी पाठ केलेलं उत्तर. शेवटी शेवटी तर ह्या लोकांनी आम्हाला फसवायचा कट केला नाही ना असा संशय यायला लागला. कितीही गेलो तरी शहर काही संपत नव्हते आणि ' इधरसे सीधा ' हे उत्तरही. असे सीधे सीधे गेलो तर जपानला पोचू असं वाटायला लागलं होतं ! आमचा अंत पाहायला नको म्हणून असेल कदाचित एकदाचं मुक्कामाचं ठाणं सापडलं. सिकंदराबाद न संपताच आम्ही हैदराबादेत उतरलो.

उतरल्या उतरल्या आधी कपडे घेऊन स्नानाला पळालो. उकाड्यानं नुसता जीव खाल्ला होता. वारेमाप तलखी. त्यातून आमच्या रूमचा फॅन असहकाराचे धोरण स्वीकारायच्या विचारात ! हे जर असंच उकडणार असेल तर तडक वापस गेलेलं बरं. इकडे जर कधीकाळी नरमांसभक्षक टोळ्या आल्याच तर उकडलेल्या माणसांची भाजी हे त्यांचं आवडतं खाद्य बनेल. सुदैवानं आम्ही असेनोपर्यन्त तशी काही टोळधाड आली नाही आणि उकाड्यानेही हळू हळू बिनशर्त माघार घेतली. जातिवंत मराठी रक्त त्यातून गरम झाले ! ती आंध्री गर्मी कितीसा टिकाव धरणार ?

आता आम्ही एवढे महाराष्ट्रीय गेलेलो. आम्हाला वाटलं होतं निदान दोन-चार लोक तरी अचंब्यानं पाहतील. पण तसं आमचं कोणालाही काहीही कौतुक वाटलं नाही. वाटणार कसं ? तिथं आधीच म्हणे शेकडो मराठी माणसं आहेत. तिथल्या

एका रस्त्याचं नाव सरळ सरळ 'वीर सावरकर रोड ' आहे. पण त्या 'वीर सावरकर' नावाने त्या पाटीवर जे चार दोन फटकारे मारले होते त्याचा अर्थ तेलगूत वीर सावरकरच होतो असं मानणे कर्मकठीण आहे. मला वाटत होतं तिथं सारखी इंग्रजीची कास धरावी लागणार. जरा हिंदीतून एखादा शब्द बाहेर पडला तर समोरच्या माणसाच्या भुवया नक्की डोळ्यात आणि पाय आमच्या डोक्यावर चढणार. पण मद्रास आणि आंध्र यांच्यात बरेच अंतर आहे म्हणे. तेलगू आणि तामिळीत फरक आहे. असेल म्हणा. पण आमची आणि तेलगूची पहिली सलामी फार मजेची झाली. आम्ही आत इडली–डोशावर ताव मारीत होतो नि बाहेर एकदम सायरन वाजल्याचा भास झाला. कोणीतरी व्यापारी ट्रंककॉल करत होता. आधीच ह्या व्यापाऱ्यांचे फोन म्हणजे नळावरच्या काडकाड मांडणासारखे, त्यातून तेळगूत. त्यांच्या त्या सतत तार सप्तकात चाललेल्या आवाजाच्या धिंगाण्यातून काही अर्थ निघू शकत असेल हे मान्य करणं म्हणजे मोर्चातील घोषणांना शब्द असतात हे कबूल करण्यासारखं झालं !

## सारंभातं

भाषेचा ह्या एवढा अपेक्षित खरखरीतपणा सोडला तरी मराठी माणसाला बुचकळ्यांत टाकणारे प्रसंगच फार. मराठीत व्युत्पत्तिशास्त्रावर मी अद्याप माझी कुऱ्हाड चालवली नाही पण हैदराबाद या सामासिक पदातील (ते तसे असलेच पाहिजे असं नाही.) उत्तरपदाचा संबंध नक्की आबादी आबादमधल्या आबादशी असणार. सोलापूरला आम्ही भाताची वाट पाहत बसलो होतो तर वेटरने बुधवार असल्याचे आम्हाला सुनावले. नि इथे पहिला पान भरून सारंभातं. नंतरचा भाताचा डोंगर रसंभातंचा. सारं जरा बरे. रसं म्हणजे पाण्याला फोडणी. असा नुसताच भात खाल्ला असता तर उपोषणानंतर जेवणाऱ्यांची जी गत होते ती आमच्या वाट्याला आली असती. ती टाळण्यासाठी आम्ही चपाती मागवून पाहत होतो. मिळायची, पण न खाल्ली तर बरी अशा लायकीची. शहाण्यानं इथं पोळी खाऊ नये आणि चहा मागू नये. "अस्सल' कॉफी प्यावी. मी मी म्हणणाऱ्या चहाबाजांचा नक्षा उतरवील इथली कॉफी. इथले रिक्षावाले हेही एक अजब प्रकरण आहे. पावसाआधी अचानक उपटणाऱ्या काळ्या मुंग्यासारखे तुरुतुरु पळत असतात. वाहकाचा धंदा नि उर्मट मग्रुरी नाही हेही अजबच ? त्यांनी सांगितलेला भाड्याचा आकडा माझ्या अंदाजापेक्षा नेहमी निम्मा असायचा. अचंब्यातच आत बसावं तर चालले भराभर पायडळ मारीत. शि. द. फडणिसांच्या चित्रासारखे, तुरुतुरु पळणारे, हसरे ! एकूण इथल्या लोकांनी सगळा खडबडीतपणा भाषेला देऊन टाकला असावा. इतक्या हॉटेलात गेलो पण एकाही हॉटेलात मॅनेजर नोकरावर खेकसताना दिसला नाही. उलट कित्येकदा आम्ही इकडे टेबलावर जेवता जेवता एखादा नोकर पटकन पत्रावळ घेऊन बाजूला बसून जेवून टाकायचा. मॅनेजर जशी आमच्या

कडे नजर टाकून जायचा तसा त्याच्याहीकडे. न राहवून मी शेवटी चौकशी केली की इथं सध्या सौजन्य सप्ताह वगैरे आहे की काय ? दुसरी एक शंका आली ती भोजनसप्ताहाची. हॉटेलात गर्दी पूजलेलीच असते—पण खायला. इथे सहस्रभोजनं चालली होती. पटपट यायचे, मुटके वळून घास गिळायचे नि भरभरा जायचे. हैदराबादेतल्या बायकांचा तो बहुधा माहेरी जायचा महिना असावा.

हैदराबादला जाऊन सालारजंग न पाहणे म्हणजे मुंबईला जाऊन राणीचा बाग न पाहण्यासारखे. राणीच्या बागेचा आता पूर्वीचा नूर राहिला नाही म्हणतात पण सालारजंग म्युझियम अजून आपला भाव ठेवून आहे. पहिला हॉल खास बच्चोंके लिये होता. पण मी जर लहान असते तर मुळीच पाहिला नसता. वस्सकन अंगावर येणाऱ्या कुत्र्यांसारख्या हात लावू नका इ. इ. च्या पाट्या गळ्यात अडकवलेल्या वस्तू कितीही छान असल्या तरी मला आवडल्या नसत्या. पण आता लहानही नव्हते आणि ह्या अशा धमक्या इतक्या अंगवळणी पडल्या होत्या की पाट्या नसत्या तरी माझी हात लावायची छाती झाली नसती. गाडी आत्ताच स्टार्ट झाली होती, पाहण्याचा उत्साह तेजीत होता म्हणून असेल कदाचित पण सलामी तर झकास घडली. सालारजंग एकूण तीन. त्यांची खरी संपूर्ण नावे बरीच काही काही आहेत, पण मॅट्रिकला इतिहास सोडल्यापासून मी नावांच्या सारखेपणाला आणि लांबीला बिलकूल डरत नाही. कबड्डी खेळायला लावणारं एखादं दोन तीन फुटी नाव जरी माझ्यावर आदळलं तरी 'फौलादी है सिने अपने'—तेच गडगडत माघारा जातं. सालारजंगांची बिरुदावलीसह नावं त्यामुळे म्युझियममध्येच आहेत. त्या तिघांचीही तीन भली मोठी पोर्ट्रेटस् आहेत. तिघेही आहेत ऐटबाज. पण पहिला उगाच शतरंजचा डाव अर्धवट टाकून हुक्क्याची नळी तशीच सोडून आल्यासारखा वाटतो. दुसरा सिनेमातल्या राजासारखा आहे. नि या म्युझियमचा कर्ताकरविता तिसरा सालारजंग कवीचा चेहरा घेऊन जन्माला आला आहे. —नवकवीचा नव्हे !— त्याचे टपोरे डोळे बोलायला उत्सुक आहेत. त्याचे कवित्वच पाहायला आम्ही सुरवात केली.

या हॉलमध्ये नाना खेळ, बाहुल्या, त्यांची सजवलेली छानदार घरं इ. सर्व आहेच. आणि काही गोष्टीतली पात्रं मूर्तिरूप घेऊन उभी आहेत. अक्षरशः जगप्रसिद्ध असलेल्या हिमराणी आणि सात बुटके पैकी सात बुटके आहेत. हिमराणी दिसली नाही. ती बहुधा राजपुत्राबरोबर सुखाने नांदत असणार. शिवाय सान्ताक्लाजच्या पुष्कळ प्रतिमा आहेत. जरा वाकलेला, पांढऱ्या शुभ्र लांब दाढीचा. खास आजोबांच्या गुळगुळीत स्मितात बुडलेले त्याचे ते डोळ आणि ओठ ! सान्ताक्लाज हा माझा अतिशय लाडका आहे. अगदी टॉम, मेरी, कॅथराईन कंपनीला जितका प्यारा असेल तितकाच "ऊ ! एक कल्पना मुलांना फसवायची !" म्हणून नाकं मुरडणारेही आहेत. कल्पनाच. पण मला ती विलक्षण आवडते. शेवटी सत्य किती ? कल्पितच

जास्त ! दुसऱ्याच्या भलेबुरेपणाच्या, स्वतःच्या चांगुलपणाच्या, न झालेल्या, न होणाऱ्या गोष्टींच्या कल्पनाच अधिक !

## ' वन मॅन कलेक्शन '

यानंतर खरे म्युझियम पाहायला सुरवात केली. जवळजवळ प्रत्येक देशाला एकेक हॉल देऊन टाकलेला आहे. बरीच पेंटिंग्ज; नाना तऱ्हेची भांडी, पुतळे प्रतिमा इ. इ. सगळे नेहमीचेच. पण कौतुकाची गोष्ट म्हणजे जमवणाऱ्याच्या रसिकतेइतकीच रसिकता मांडणीत आहे. शाही महालातून फिरत असल्यासारखे वाटायचे सतत ! एक खास हॉल हिरे, पाच माणके इ. मौल्यवान वस्तूंसाठी आहे. त्या खास वेगळ्या ठेवल्या आहेत म्हणूनच त्यांचे वेगळेपण मानायचे. एऱ्व्ही माझ्यासारख्या अनभिज्ञाला "सोने रूपे अम्हा मृत्तिकेसमान." बरीच भरजरी, तलम वस्त्रे आहेत – जुन्या पैठण्या, शालूही. दृष्टिक्षेपावरून त्यांच्या वजनदारपणाचा जो अंदाज येतो तो ' बरं झालं आपल्या वेळी नाहीत ह्या ' म्हणून निश्वास सोडायला लावतो. एरवी कपडा असा आहे की अंगावर घालायचीच इच्छा होते. शस्त्रसंग्रह, हस्तलिखित काय न काय अक्षरशः अजायबघर आहे. हे एवढं सगळं वन मॅन कलेक्शन म्हटल्यावर त्या एकाच निर्विकार निर्गुणातून हा सृष्टीचा पसारा पसरला यावर विश्वास बसायला लागतो.

इतक्या वेळ माणसांच्या लोंढयातून आम्ही पुढे सरकत होतो आणि अचानक सगळी जणं कुठंतरी पसार झाली. नंतर कळले की बारा वाजताचे खालच्या चौकातील घड्याळाचे ठोके ऐकायला गेली आहेत. आम्हीही मग एकच्या आधी धावत पळत गेलो. झोपडीतून येणारा म्हातारा आला नि टोला ठणकावून फटकन दार बंद करून आत गेला. मला आपले ह्या घड्याळापेक्षा घुबडाचे घड्याळ जास्त आवडले. कदाचित ते दुर्लक्षित होते म्हणून असेल. पण लंबकाच्या प्रत्येक हेलकाव्याबरोबर हलणारी त्याची नजर जिवंत वाटत होती. त्या घुबडाप्रमाणेच मनात घर करून राहिला तो एक नीग्रो. फ्लूट वाजवत होता. त्याचे डोळे विलक्षण होते. तुकतुकीत काळ्या रंगावरचे ते दोन डोळे – कीटस्च्या ग्रशियन अर्नची उगाचच आठवण झाली मला. जपानी कशिदाकाम तर नजर ठरू देत नाही. हाताची एवढी विलक्षण सफाई आणि गुळगुळीतपणा आहे की नजर आपोआप घसरत खाली येते – देवापुढे डोळे आपोआप मिटले जातात तसे डोळे बंद होतात. कला ही गोष्टच पवित्र आहे म्हणा – परंतु का कुणास ठाऊक चिनी हॉलमध्ये मला गुदमरल्यासारखे झाले. कदाचित चिनी आक्रमणाचा परिणाम असेल पण मला तो हॉल उगाचच ओंगळ वाटला. नुसता ओंगळ नाही स्वप्नात वेडेवाकडे अक्राळविक्राळ प्राणी दिसल्यानंतर जे वाटते तेच तिथे जाणवले !

– काही तरी ७०, ७५ खोल्यांचे प्रचंड म्युझियम. शेवटी शेवटी परीक्षेच्या आधीच्या काही तासांची अवस्था आली. पाहत होतो नुसते पण वेदन – संवेदनच

होत नव्हते. सालारजंगने जमा करण्यात जन्म घालावला, त्याचे यथार्थ रसग्रहण करायचे तर निदान निम्मा जन्म तर घालवायला हवा. एकच्या ठोक्यासाठी चौकातल्या घड्याळ्यापाशी आलो. नि मान अवघडेपर्यंत एकटक पाहत राहिलो. जसा ठोका पडला तस्से पाण्याकडे पळालो. या म्युझियम मधल्या इतर अनेक गोष्टींप्रमाणेच मला तिथले थंड पाणीही अतिशय आवडले. जरा ताजेतवाने होऊन शेवटच्या हॉलकडे वळलो. पहिला नि शेवटचा हे दोन हॉल आम्ही खरे नीट पाहिले. बाकीचे हॉल म्हणजे बडव्यांनी दिलेले विठोबाचे दर्शन! या हॉलमध्ये एक सद्गृहस्थ खुर्चीवर बसून सिगारेट ओढीत एक पुस्तक वाचत बसलेले आहेत. पाहताना असे वाटते की आता कुठल्याही क्षणी हा सिगारेट झाडून डाव्या पायावरचा उजवा पाय खाली घेऊन डावा पाय वर ठेवील नि पान उलटेल. या हॉलमध्ये बऱ्याच इंग्रज लोकांचे पुतळे आहेत. शेक्सपियरची नावाची पाटी वाचल्याआधीच मी हाच शेक्सपियर म्हणून ओळखला. नाव वाचून मिल्टन कळला. पण पुतळ्यात तो आंधळा दाखवला आहे की नाही ते पाहयचेच राहून गेले. आणखीही बरेच पुतळे होते पण त्या त्या लोकांबद्दल मला ओ की ठो माहिती नव्हती. पलीकडेच काही निनावी पुतळे होते त्यांपैकी काहींची जरी इकडे बदली झाली असती तरी मला काही वाटले नसते.

अशा प्रकारे उघड्या पडलेल्या अज्ञानाचे बरेच मोठे गाठोडे घेऊन आम्ही सालारजंगमधून बाहेर पडलो. पण तेवढ्यावर निभावले नाही. गोवळकोंड्याने त्या



गाठोड्यात आणखी भर घातली. गोवळकोंडा नावाचा एक किल्लाच आहे हे मला नक्की माहीत होते आणि चांदबिबीशी त्याचा संबंध असेल अशी एक शंका. माझे हे ज्ञान म्हणजे अज्ञान गोवळकोंड्याला गेल्यावर झणझणीतपणे जाणवले. कोणीतरी म्हणाले, बहुधा वझे असणार—पूर्वी याचे नाव भागानगर होते. वझे हे आमचे सबंध ट्रीपचे गाईड होते. त्यांचा उद्योग सोडून आमच्याबरोबर आम्हांला हैद्राबाद दाखवत होते. आम्ही विचारू ते प्रश्न मुकाट्याने ऐकून उत्तर देत होते. आमच्या मार्गदर्शनानंतर आणि प्रश्नांमागून प्रश्नांनंतर ते जगाच्या कुठल्याही भागात गाईडगिरी करू शकले असते. गाईडला लागणारे ज्ञान आणि मुख्य म्हणजे सोशिकपणा त्यांच्याकडे शंभर टक्के होता. पर्वतीचे नाव पर्वतीच का म्हणून मला कोणी विचारले तर आधी मी त्याला मूर्खांच्या यादीत घालेन आणि नंतर पार्वतीशी संबंध जोडून मोकळी होईन. त्यातल्या त्यात पर्वती हे नाव का पडले हा जरा तरी 'कनसिडरेबल' प्रश्न आहे, पण आम्ही हैद्राबाद ॲक्शनपासून सध्याच्या नवाबाच्या दैनंदिन कार्यक्रमापर्यंत, कुठल्याही लेनच्या नावापासून युनिव्हर्सिटीच्या ब्रीदवाक्यापर्यंत काहीही विचारत होतो आणि ते सांगतही होते. हे एवढं सगळं यांनी माहीत करून घेतलं केव्हा कुणास ठाऊक? कारण त्यांना हैद्राबादेत येऊन काहीतरी तीनचार वर्षंच होताहेत. मी पंतप्रधान होईन तेव्हा त्यांना नक्की रशियातल्या भारतीय वकिलातीत वकील नेमेन. काय शामत आहे पोलादी पडदा शाबूत राहील ?

## गोवलकोंडा उर्फ भागानगर

गोवळकोंड्यानेच काय पण थल्या बहुतेक सर्वच गोष्टींनी धर्मांतर केले आहे. मुळामुठेसारखीच थांबत थांबत वाहणारी मुसा म्हणे आधीची मुचकुंद. नदीचे मुचकुंद नाव कसे काय कोण जाणे? पण मुचकुंद नाव मुसापेक्षा जवळीक साधते. आपली नदी वाटते. ह्या आपल्या वाटण्याला खरा काही अर्थ असतो का? की नुसता सवयीचा परिणाम? लहानपणापासून 'या अल्ला, खुदा परवर दिगार' ऐकलं असतं तर मसा आपलं वाटलं असतं का? संस्कारांचं भरताड झालंय नुसतं—दुसऱ्यांनी लादलेल्या किंवा स्वतः लादवून घेतलेल्या. त्याखेरीज माझं म्हणून काही नाहीच का?

—प्रवासात हे असं होतं. पाण्यात सूर मारावा तसं मन दोन पाच मिनिटंच, पण जरा आत जातं. उगाच गदगदायला होतं—शिजत आलेल्या भातासारखं !

—हूं ! आम्ही गोवळकोंड्यापाशी येऊन पोचलो होतो. काय पाहायचं हे माहीत नव्हतं म्हणून काही न पाहिल्याचा खेद नव्हता. वरच्या जिन्यावरून लांब पसरलेला किल्ल्याचा परिसर किडलेल्या दाढेसारखा डोळ्यांना ठणकत होता. सारं निर्जीव होतं. पायथ्याशी ट्रेनिंग कँपमध्ये मात्र जोरजोरात हालचाली चालू होत्या. विद्यार्थी नेमबाजी करीत होते. त्यांचे फायरिंगचे आवाज दुपटीपेक्षा मोठे होत वाढत वाढत

शांत होत होते. गोवळकोंडा स्तब्धच होता. कथेतल्या श्रीमंत मुलीच्या गरीब आई-सारखा कोपऱ्यात निमूटपणे सजा भोगीत उभा होता.

गोवळकोंड्याहून पाच सात मैलांवर उस्मानसागर ! हुसेनसागर कालच पाहिला होता आज हा. नुकत्याच रांगायला शिकलेल्या मुलीसारख्या, खडकातून अडखळत आपटत जाणाऱ्या मुसेला अडवून एवढे प्रचंड सागर कसे काय निर्माण केले कोणास ठाऊक ? जादूच्या दोन इंची डब्यातून खाऊचे पुडक्यामागून पुडके निघावे तसे हे सागर आश्चर्यात टाकत होते. बाकी पाण्याची एक गंमत असते. लहानशा घुमटी खालचा शेंदरी दगड असो किंवा आकाशात घुसणाऱ्या प्रचंड देवळातली घडीव मूर्ति असो–देव दिसला की हात जोडावासा वाटतो तद्वत गावाशेजारचा ओढा असो किंवा अरबी समुद्र असो–पाणी दिसलं की पाय बुडवावेसेच वाटतात. लहान मूल आजोबांच्या अंगावर जशी दंगामस्ती करतं तसं गुधडावंसं वाटतं !

उस्मानसागर हे आमचं शेवटचं लक्ष्य ! बहुतेक सर्व पाहून झालं होतं. पण वेळ मिळाला म्हणून युनिव्हर्सिटीही पाहून टाकली. युनिव्हर्सिटी एकदम भव्य आहे. हिंदु, इस्लामी आणि युरोपियन तिन्ही वास्तुकलेचा त्यात संगम आहे. (हे तिथल्या प्यूननं सांगितल्यावर आम्हाला कळलं).

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही एअरपोर्टवरून आलो. तिथपर्यंत वझ्यांची सोबत होती. मग ते उतरले. बसनं परत जाईन म्हणाले. निरोप घेऊन आम्ही ब्रेकवरचा पाय काढला. ते माघारी फिरले. अक्षरशः चार दिवसांची ओळख. पण लेकीचं कार्य परगावी केल्यावर तिला तिथंच ठेवून येताना काय वाटत असेल तशी गत झाली !

आता परतीचा प्रवास. मला उगाचच मुस ग्रुपच्या आदिमायेची आठवण झाली. आदिमायेला सरण्याचा शाप असतो आणि म्हणूनच कदाचित ममताळूपणाचा उःशाप असेल. लहानपणी माझ्या कपाटात मोरपिसं, चांदी, रंगीत कागद यांच्या जोडीला आमच्या जुन्या घरातला एक दगडसुद्धा होता.

आता त्याच ' अलिबाबाच्या गुहेत ' हैदराबादही एक खास कोपरा घेऊन खुशीत बसलं आहे.

# नेपाळ-राजकारण

कालाचा पडदा दूर सारून विस्मृतीत विरून गेलेल्या नेपाळी माणसाला साकार करण्याचा आपण प्रयत्न केला. नेपाळमधील आपला प्रवास आता संपत आला आहे. वर्तमानाच्या उंबरठ्यावर आपण उभे आहोत. आता आपल्यासमोर असलेला नेपाळी मनुष्य आहे मोठ्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा, शूरास साजेल अशा दिलदार मनोवृत्तीचा, बळकट हाडापेराचा, रुंद खांद्यांचा. त्याच्या कमरेला लटकाविलेली आहे त्याची आवडती कुकरी. वर्तमानाशी झुंज द्यावयास तो सज्ज आहे. त्याच्या कर्तृत्वाची ओळख आपणास आता करून घ्यावयाची आहे.

आधुनिक युगाची सुरुवात नेपाळमध्ये राणाशाहीच्या अस्तापासून झाली असं मानण्यात येतं, ते कितपत खरं म्हणायचं ? तसं म्हटलं तर विसाव्या शतकाची पन्नाशी उलटून गेली तरीसुद्धा नेपाळच्या डोंगराळ भागात कित्येक खेडी अशी होती की जेथे चाक माहीत नव्हतं– तिबेटी प्रार्थनाचक्रांसाठी वापरलं जायचं तेवढंच चाक ! धातूचा वापरही सार्वत्रिक नव्हता–घरबांधणीत खिळे वापरले जात नव्हते. होड्या, शिड्या, लाकडाची खोडें खोदून तयार केल्या जात होत्या– अजूनही जातात– कारण करवत प्रचारात नव्हती. विस्तव चकमकीने पेटविला जात होता, कारण काड्यापेटी अंतर्भागात पोचलीच नव्हती. बाकी आधुनिक युगाची निशाणी म्हणजे सिगरेट असं म्हटलं तर मात्र नेपाळमध्ये आधुनिकतेचा शिरकाव झाला असं म्हणावयास हरकत नाही. ती आली असावी सैन्यात काम करणाऱ्या लोकांबरोबर आणि आता मात्र चार–पाच वर्षांच्या मुलां-

अन्नपूर्णा
आणि
धवलगिरी

# आर्थिक व राजनैतिक

मुलींपासून जख्खड म्हाताऱ्यांपर्यंत सर्वजण सिगरेट निःशंकपणे ओढतात !

बाह्य जगातील मतभ्रष्ट विचाराच्या वादळांपासून आपल्या राष्ट्राला सुरक्षित ठेवण्याचा राणा लोकांनी आटोकाट प्रयत्न केला. खुद्द नेपाळी लोकांना आपल्या देशात अनिर्बंध संचाराची मुभा नव्हती तेथे परदेशी-यांना काठमांडूच्या वेशीबाहेरच्या टेकडीवर सहल करण्यास जाण्यालाही परवाना लागत असल्यास नवल काय ! पण स्वबांधवांना परदेशी जाण्यास, तेथे नोकरी धरण्यास मात्र प्रतिबंध करणे राज्यकर्त्यांना परवडणारे नव्हते. त्यांच्या कमाईवर तर राष्ट्राची मदार होती. हिंदुस्थानात आणि इतरत्र गेलेल्या या लोकांनी नुसत्या नोकऱ्याच केल्या नाहीत तर नको ते विचार डोक्यात भरवून आडदांडपणा केला आणि राणाशाहीला उलथून पाडलं ! सर फ्रॅन्सिस टकरसारखा ब्रिटिश नोकरशाहीचा प्रतिनिधी अजूनही बिचारा हळहळतो, " राणाशाहीत नेपाळी लोक किती तरी सुखी होते ! "

नेहरूंच्या मध्यस्थीमुळे नेपाळमध्ये होऊ घातलेली यादवी टळली आणि नेपाळी कॉंग्रेस व राणा यांच्यात समेट होऊन एक संमिश्र सरकार बनले. पंतप्रधान मात्र होता राणा मोहन समशेर. पण ही परिस्थिती सार्वत्रिक पाठिंबा असलेल्या कॉंग्रेसला मान्य होणे शक्य नव्हते. त्यातच राण्यांनी " गुरखा परिषद " हा स्वतःचा पक्ष काढून कॉंग्रेसला विरोधी आघाडी स्थापन केली. गृहमंत्री बी. पी. कोईराला यांच्या निवासस्थानावर हल्ला झाला. मतभेद इतके विकोपास गेले की कॉंग्रेस मंत्रिमंडळातून बाहेर पडली. मंत्रिमंडळाचा पायाच उखडला गेल्यामुळे

लेखांक पाच

प्रकाश गोळे

राणा मोहन समशेर व त्याच्या पाठीराख्यांनीही राजीनामा दिला.

काँग्रेसमध्येही दुफळी माजली. डॉ. के. आय्. सिंग प्रभृती कडव्या राष्ट्रवाद्यांना राणाशाहीशी झालेला समझोताच मुळी मान्य नव्हता. काँग्रेसमधून फुटून जाऊन त्यांनी बंडखोरीला सुरुवात केली. सिंगला पकडण्यासाठी भारतीय पोलिसांची मदत घ्यावी लागली नेपाळी भांडणे दिल्लीत मिटायची असा पायंडाच पडू लागला होता. नवोदित राष्ट्रवादाने चेतलेल्या नेपाळ्यांना हे अपमानास्पद वाटू लागले, हे परावलंबित्व नको झाले. नेपाळ सतत आपल्यावर अवलंबून राहावा असा भारताचा प्रयत्न असतो, हा संशय बळावू लागला. जहाल राष्ट्रवादाला भारतविरोधाची धार चढू लागली.

संमिश्र मंत्रिमंडळ गडगडले अन् राजा त्रिभुवनपुढे प्रश्न उभा राहिला. सार्वत्रिक पाठिंबा असलेल्या नेपाळी काँग्रेसकडे सत्ता जाणार हे उघड होते. पण लोकप्रिय, राष्ट्रवादी पुढारी बी. पी. कोईराला पंतप्रधान होऊ देणे राजाला परवडणारे नव्हते. खरंच नेपाळमध्ये अजूनही हा एकच पुरुष असा आहे की, लोकनिष्ठच्या बाबतीत तो राजाचा प्रतिस्पर्धी होऊ शकतो. राजा त्रिभुवन काय किंवा राजा महेंद्र काय, दोघांनीही त्याच्या हातांत सत्ता जाऊ देण्यास विरोध केला आहे अन् सत्ता जेव्हां त्याच्या हातांत गेली तेव्हां ती हिसकावून घेतली आहे.

राजाने मवाळ पुढारी मातृकाप्रसाद कोईराला यास पंतप्रधान नेमले. १९५२ साली निवडणुका होणार होत्या, पण परिस्थिती अस्थिर म्हणून त्या पुढे ढकलण्यात आल्या. पंतप्रधानाला जनतेचा पाठिंबा नाही, तो केवळ राजाच्या मर्जीवर आहे ही गोष्ट उघड झाली. मुलकी व लष्करी अधिकारी त्यास जुमानीनासे झाले. कोणतेही निर्णय घेतले जाईनात. सत्ता राजाच्या हातात केंद्रित होत होती, पण अमर्याद अधिकाराचा पुरेपूर उपयोग करावा अशा मनोवृत्तीचा मुळी हा राजाच नव्हता. नाही म्हणायला सैन्याचा प्रमुख स्वत: असल्याचा मात्र त्याने पुनरुच्चार केला. सेना पाठीशी असण्याचा फायदा झाला त्याच्या मुलाला–राजा महेन्द्राला.

## अमेरिकन मदतीचा ओघ

या अंतर्गत घडामोडी चालू असतानाच नेपाळभोवतालच्या परिस्थितीतही झपाट्याने फरक पडत चालला होता. १९५० साली चीनने तिबेट आपल्या स्वामित्वाखाली आणले आणि चिनी सैन्य नेपाळी सरहद्दीजवळ येऊन खडे झाले. कम्युनिस्ट आणि कम्युनिस्टविरोधी राजकारणाचे धगधगीत वारे नेपाळच्या शीतल वातावरणात घुसू लागले.

१९४७ सालीच नेपाळ–अमेरिका मैत्रीचा करार झाला होता. अविकसित राष्ट्रांना कम्युनिस्ट वर्चस्वापासून दूर ठेवण्यास बद्धपरिकर झालेल्या अमेरिकेचे एका कम्युनिस्ट राष्ट्राच्या सरहद्दीवरील नेपाळकडे लक्ष गेल्यास नवल नाही. नेपाळचा आर्थिक विकास हा अमेरिकन काँग्रेसपुढील तातडीचा विषय बनला. कारण आर्थिक

विकासाशिवाय राजकीय स्थैर्य नाही आणि राजकीय स्थैर्य जेथे नाही तेथे कम्युनिझमचे रोपटे फोफावणारच, अशी अमेरिकेची धारणा होती. जानेवारी १९५२ मध्ये अमेरिकेचे तांत्रिक सहकार्य मंडळ काठमांडूत उभे राहिले आणि अमेरिकन मदतीचा ओघ नेपाळकडे वळला.

अविकसित राष्ट्रांतील जनता सुधारणेसाठी अती उत्सुक आहे हा समज खोटा ठरण्यासारखा मात्र अनुभव या बाबतीत अमेरिकेला आला. खेड्यांमध्ये जाऊन काम करण्यास काठमांडू येथील अमेरिकन तांत्रिकशाळेत शिक्षण घेऊन तयार झालेले तरुण तयार नसत. त्यामुळे खेड्यांच्या विकासाची योजना रेंगाळली खेड्यांमध्ये मलेरिया निर्मूलनासाठी डी. डी. टी. चे फवारे मारण्यात आले खरे, पण स्वच्छतेचा भोक्ता असलेला डोंगरी मनुष्य डी. डी. टी. चे पांढरे डाग भिंतीवरून काढण्यासाठी त्या पुन्हा छान लाल मातीने सारवून काढी, आणि डी. डी. टी. चा उपयोग शून्य करून टाकी. वाया चाललेल्या पाण्याचा सिंचनासाठी उपयोग व्हावा म्हणून पंप आयात केले गेले. पण त्यांना लागणारे डिझेल तेल उपलब्ध नसल्याने ते तसेच गंजून गेले. बॅटरीवर चालणाऱ्या रेडिओंची तीच गोष्ट. एकदा मसाला संपल्यावर दुसरी बॅटरी होती कोठे उपलब्ध !

नेपाळला मदत देण्याचा मनोदय भारताने वारंवार बोलून दाखविला होता. पण सरहद्दीवर चिनी सैन्य खडे झाल्यापासून मदत देण्याची निकड जास्त भासू लागली हे खरे. नेहरूंनी लोकसभेत सांगितले, " स्पष्ट बोलायचं म्हणजे नेपाळमध्ये परकीय हस्तक्षेप झालेला आम्हांला आवडायचा नाही आणि आम्ही तो चालूही देणार नाही. नेपाळ हे स्वतंत्र राष्ट्र आहे, हे आम्हांस मान्य आहे आणि आम्ही त्याचे अभीष्ट चिंतितो." नेपाळी राजकारणात हस्तक्षेप करण्यासारखी निर्माण झालेली परिस्थिती आणि नेपाळ हे स्वतंत्र राष्ट्र आहे हे मान्य करावयास लावणारी परिस्थिती या दोन विरोधी गोष्टींच्या कात्रीत भारत सरकार सापडले होते हे नेहरूंच्या वरील वाक्यांवरून स्पष्ट होते. नेपाळमधील चालू राजवटीला शक्य तितकी मदत देऊन परकीय आक्रमणास तोंड द्यावयास समर्थ बनविणे हाच एक मार्ग शिल्लक होता आणि तोच भारताने स्वीकारला.

१९५० च्या मैत्रीच्या कराराला एक गुप्त कलम जोडण्यात आले होते. त्यात म्हटले होते की, 'परकीय आक्रमणाचा धोका एका राष्ट्रास निर्माण झाल्यास दुसरे राष्ट्र तो सहन करणार नाही.' या कलमाचे अस्तित्व नेहरूंनी १९५९ मध्ये उघड केले. १९५२ मध्ये १५० लष्करी अधिकाऱ्यांचे एक शिष्टमंडळ नेपाळी सैन्याची पुनर्रचना करण्यास भारतातर्फे पाठविण्यात आले. सरहद्दीवर लष्करी ठाणी उभारण्यात आली. त्यावर वायरलेस ऑपरेटर म्हणून भारतीय लोक काम पाहत होते. कारण पुरेसे नेपाळी लोक हे शिक्षण घेतलेले नव्हते. असे म्हणतात की, या ऑपरेटर लोकांचा संबंध काठमांडू येथील भारतीय वकिलातीशी जोडलेला होता. नेपाळच्या

सुरक्षा मंत्रालयाशी नव्हता. कोणत्याही राष्ट्रवादी नेपाळीस या गोष्टी मानहानिकारक वाटणे साहजिक होते. भारतविरोधाच्या रोपट्यास खतपाणी मिळाले. भारतविरोधी भावना फैलावण्यात नेपाळी कम्युनिस्टांचा पुढाकार होता. पण राजा किंवा मंत्रिमंडळ यांना भारताला उघडपणे दुखवून चालणार नव्हते. एक तर अंतर्गत कलह शमविण्यासाठी भारताची मदत घ्यावी लागत होती, आणि दुसरे म्हणजे चीनपासून धोका नाही असे कम्युनिस्ट जरी म्हणत असले तरी चिनी धोरणाचा सुगावा नीटसा लागलेला नव्हता.

जानेवारी १९५२ मध्ये मातृकाप्रसाद कोईरालांनी दिल्लीची वारी केली व मदतीची मागणी केली. १९५३ मध्ये काठमांडूला विमानतळ बांधण्याचे आणि रक्षौल–काठमांडू त्रिभुवन राजपथ बांधून देण्याचे भारताने मान्य केले. ही दोन्ही कामे भारतीय सैन्याने हाती घेतली. १९५४ मध्ये भारतीय तांत्रिक सहकार्य मंडळाची स्थापना होऊन ५०० खाटांचे एक रुग्णालय बांधायचे ठरले, पण यासाठी जी सामग्री आयात झाली, तो कोठे गडप झाली हे न कळे! सिंचन आणि पिण्याचे पाणी पुरविण्याच्या योजनाही आखण्यात आल्या. नेपाळच्या संरक्षणास पूरक असलेल्या योजना पार पाडण्यावर भारताने भर दिला. पण नेपाळी लोकांना शिक्षण देण्याच्या भानगडीत या वेळी भारत पडला नाही. भारतीय मदतीवर जी टीका झाली ती मुख्यत: या कारणांमुळे.

१९५४ सालच्या उत्तरार्धात राजा त्रिभुवन यांची प्रकृती बरीच खालावली आणि १३ मार्च १९५५ रोजी त्यास मृत्यू आला. १४ एप्रिल १९५५ रोजी त्यांचा पुत्र ३४ वर्षांचा राजा महेंद्र राज्यकारभार पाहू लागला. राजाच्या हातात केंद्रित झालेल्या सत्तेचा वापर आता केला जाणार ही गोष्ट राजा महेंद्रांच्या पहिल्याच भाषणातून प्रतीत झाली. चालू पक्षीय राजकारणाबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करून त्यांनी धार्मिक, सामाजिक व औद्योगिक प्रतिनिधींची एक परिषद घेतली. १९५७ साली निवडणुका घेण्याचे या परिषदेला राजाने वचन दिले. याच वेळी आधीच फारसा पाठिंबा नसलेल्या मातृकाप्रसाद कोइरालांच्या मंत्रिमंडळाने राजीनामा दिला आणि सर्व अधिकार राजाच्या हातात आले. स्वत:स मानवतील अशा सुधारणा राज्यकारभारात घडवून आणण्यास राजाने सुरुवात केली.

## नेपाळ–चीन नवे संबंध

नेपाळचे भारतावरील परावलंबित्व कमी झालेच पाहिजे, असा निश्चय या खंबीर, राष्ट्रवादी राजाने केला आहे हे तत्काळ प्रत्ययास येऊ लागले. नेपाळने यूनोचे सभासदत्व स्वीकारले व बाह्य जगाच्या राजकारणात उत्साहाने लक्ष घालण्यास सुरुवात केली. दिल्लीतील चिनी वकिलाला निमंत्रण गेले व चीनशी राजनैतिक संबंध जोडण्याची आपली इच्छा राजाने बोलून दाखविली. जानेवारी १९५६ मध्ये राजाने टंकाप्रसाद आचार्य या कम्युनिस्टांना मानविणाऱ्या पुढाऱ्यास पंत-

प्रधान नेमले. कम्युनिस्ट पक्षावरील बंदी उठविण्यात आली. सोव्हिएट युनियनशी राजनैतिक संबंध जोडण्यात आले. २० सप्टेंबर १९५६ रोजी चीनशी करार झाला व जंगबहादूर राण्याने तिबेटमध्ये नेपाळी लोकांसाठी मिळविलेल्या खास हक्कांवर व तिबेटकडून येणाऱ्या खंडणीवर नेपाळने पाणी सोडले. पंतप्रधानांनी नंतर चीनला भेट देऊन आर्थिक साहाय्याच्या करारावर सही केली. चीनने भरघोस मदतीचे आश्वासन दिले. ती मदतही पुष्कळशा रोख पैशाची होती. चिनी तंत्रज्ञ येणार नव्हते, तसेच कोणत्याही अटी तिला चिकटविलेल्या नव्हत्या.

चीनने केलेल्या मैत्रीच्या प्रदर्शनाने नेपाळ इतका भारावून गेला की भारताचे मैत्रीचे धोरण काहीसे मानभावीपणाचे आहे अशी शंका त्यास येऊ लागली. ऑक्टोबर १९५६ मध्ये राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसादांनी नेपाळ भेट देताना म्हटले की, नेपाळचे मित्र हे भारताचे मित्र होत आणि नेपाळचे शत्रू हे आपलेही शत्रू, असे भारत मानेल. या वाक्यालाही स्वामित्वाच्या भावनेचा वास येतो आहे अशी नेपाळी वर्तमानपत्रांनी त्यावर टीका केली.

चीन–नेपाळ मैत्रीचे पुढचे पाऊल म्हणजे जानेवारी १९५७ मध्ये चाऊ–एन्–लाय यांची नेपाळ भेट. नेपाळला चीन आर्थिक मदत करणार या आश्वासनाबरोबरच चौने नेपाळ–चीन यांमधील वांशिक एकतेवर भर दिला. काठमांडूतील बौद्ध मंदिरास देणगी देऊन चौने आणखी लोकप्रियता संपादन केली.

नेपाळचा पंतप्रधान कम्युनिस्टांना अनुकूल होता म्हणून चिनी मैत्रीवर भर देण्यात आला असे मानणे चुकीचे होईल. राजाने नेमलेला हा पंतप्रधान स्वतंत्र धोरण आखण्यास असमर्थ होता, आणि आपणांस तो नकोसा झाल्यावर राजाने त्याला दूर केले. ऑक्टोबर १९५७ मध्ये टंकाप्रसाद आचार्यांनी राजीनामा दिला !

## डॉ. सिंगचे नवे धोरण

एके काळी बंडखोर म्हणून गणल्या गेलेल्या डॉ. के. आय्. सिंग यांची राजाने पंतप्रधान म्हणून नेमणूक केली. आपल्या हद्दपारीचा काळ या गृहस्थांनी चीनमध्ये काढला आणि काय झाले कुणास ठाऊक ? एके काळी डाव्या विचारसरणीचा म्हणून गणला गेलेला हा पुरुष चीनमधून परत येताच कम्युनिस्टविरोधी बनला आणि भारताबरोबर नेपाळचे संबंध घनिष्ट राहिले पाहिजेत, या मताचा पुरस्कर्ता झाला ! राज्यकारभार हाती घेतल्याबरोबर त्यांनी रशिया व चीनला वकिलाती उघडण्यास मनाई केली. चीनबरोबर १९५६ साली झालेल्या तहाला नेपाळने पूर्ण मान्यता कधीच दिलेली नाही, असे जाहीर केले. भारताच्या काश्मीरवरील भूमिकेला पूर्ण पाठिंबा दिला. पण इथेच या गृहस्थांची सद्दी संपली. केवळ चार महिन्यांतच राजाने त्यांना रजा दिली आणि पाच महिने स्वतःच राज्यकारभार चालविला.

नेपाळी राजकारणात राजा या व्यक्तीचे अस्तित्व प्रकर्षाने जाणवू लागले होते. एके काळी लोकांच्या दृष्टीसही न पडणारा राजा प्रांताप्रांतांतून हिंडू लागला होता,

सभा घेऊ लागला होता, ठिकठिकाणच्या लोकस्थितीचा जागेवर हजर राहून अदमास घेत होता. राजाची लोकप्रियता जनतासंपर्काच्या भक्कम पायावर उभारली गेली.

नेपाळच्या अंतर्गत आणि परराष्ट्रीय राजकारणातील बदल हा खास चिंतेचा विषय बनला दोन राष्ट्रांचा—भारत आणि अमेरिका. नेपाळच्या विकासकार्यात जास्तीत जास्त हातभार होता याच राष्ट्रांचा. चालू विकास-योजनांच्या प्रगतीवर अंतर्गत राजकारणातील फेरफारांचा परिणाम होणे अपरिहार्य होते—कारण मंत्रिमंडळात बदल झाला की मुलकी अधिकाऱ्यांमध्येही व्हावयाचा. नेपाळच्या आर्थिक स्थितीकडे राजकारणी लोकांचे अजून लक्षच गेले नव्हते ! विकास योजनांमधील नेपाळच्या वाटणीचा भाग पार पडत नसे. कारण पैसेच नसत. तेव्हा संपूर्ण योजनाच पार पाडण्याशिवाय अमेरिकन तांत्रिक सहकार्य मंडळाला गत्यंतर नसे. राप्ती नदीच्या खोऱ्यातील जंगल तोडून, नवीन जमीन लागवडीखाली आणण्याची योजना अमेरिकेने हाती घेतली. पण नवीन तयार झालेली जमीन काठमांडूच्या जमीनदार पुढाऱ्यांनी बळकाविली आणि पूर्वीचीच जमीनदारी पद्धती तेथे चालू झाली.

## रशिया—चीन—अमेरिका यांच्यातील स्पर्धा

चीनने नेपाळला मदत देऊ केली आहे ही बातमी बाहेर आली न आली तोच भारतीय मदतीतही दुपटीने वाढ करण्यात आल्याचे जाहीर झाले. त्रिशुळी येथे विद्युत्निर्मितीसाठी धरण बांधणे, निरनिराळ्या ठिकाणी नऊ विमानतळ बांधणे वगैरे योजना हाती घेण्यास भारत तयार आहे असे जाहीर करण्यात आले. अर्थात् पूर्वीच्याच कारणासाठी या योजनांवर टीका झाली असल्यास नवल नाही.

स्वतः हातात पुनश्च सत्ता घेतल्यावर राजा महेन्द्राला राजकीय पक्षांच्या चळवळीला तोंड द्यावे लागले. फेब्रुवारी १९५९ मध्ये निवडणुका घेण्याचे आश्वासन शेवटी राजाने दिले. मे १९५८ मध्ये राजाने एका सर्वपक्षीय मंत्रिमंडळाची नेमणूक केली. नेपाळी कॉंग्रेस आणि गुरखा परिषद या दोन मोठ्या पक्षांनाही त्यात प्रतिनिधित्व मिळाले ! अंतर्गत राजकारणाच्या कटकटींना विराम देऊन जून १९५८ मध्ये रशियन सरकारच्या आमंत्रणावरून राजा मॉस्कोस गेला, आणि रशियन मदतीची भरघोस आश्वासने घेऊन परतला. ही बातमी बाहेर पडताच अमेरिकन वकिलातीत धावपळ होऊन वॉशिंग्टन भेटीचे आमंत्रणही राजाला लगोलग देण्यात आले ! रशियन मदतीची बातमी कळताच अमेरिकन साहाय्याच्या रकमेतही वाढ झाली. रशिया नेपाळमधील विमान वाहतुकीसाठी मदत देण्याच्या विचारात आहे हे कळताच रॉयल नेपाळ एअरलाईन्ससाठी तीन डकोटा विमाने अमेरिकेहून धाडण्यात आली !

मदतीद्वारे नेपाळी राजकर्त्यांची मर्जी संपादन करण्यात रशिया चीनपेक्षाही यशस्वी ठरला. स्वतः राजावर एक विमान, तीन मोटारबोटी आणि अनेक मोटार-

सायकली अशा वैयक्तिक भेटींचा वर्षाव करण्यात आला. शिवाय एक हॉस्पिटल, एक साखर कारखाना, एक सिगारेट कारखाना आणि विद्युत्‌निर्मितीसाठी एक धरण बांधून देण्याचे रशियाने ठरविले. शिवाय राजाची लाडकी योजना—तराई-मधून जाणारा पूर्वपश्चिम रस्ता—पुरी करण्याचेही रशियाने आश्वासन दिले. ज्या वस्तूंसाठी नेपाळला भारतावर अवलंबून राहावे लागत होते त्याच वस्तू रशियन साहाय्याने देशात बनविल्या जाणार होत्या हे विशेष.

निवडणुका होणार हे निश्चित झाले, मात्र बारीकसारीक राजकीय पक्षांच्या हातापायांतले जणू त्राणच नाहीसे झाले. आपल्या पक्षाचे धोरण तरी काय, याचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू झाला ! कारण निवडणुकीचा जाहीरनामा तर राष्ट्रा-पुढे ठेवणे जरूर होते. शेवटी झाले काय की सर्वांचे जाहीरनामे जवळजवळ एकाच छापाचे झाले. सर्वांचा प्रयत्न एका विशिष्ट वर्गाचाच पाठिंबा मिळविण्याचा—सुशिक्षित मध्यम वर्गाचा. त्याला रुचेल तो कार्यक्रम पुढे ठेवणे ही गोष्ट अपरिहार्य. अंतर्गत धोरणाविषयी नवीन काही सांगणे कोणालाच शक्य नव्हते. तेव्हा प्रचार मोहिमां-मध्ये गाजले परराष्ट्रीय राजकारण. पाकिस्तानकडून पैसा घेतल्याचा आरोप झाला बी. पी. कोईरालांवर. अमेरिका आपला नाश करण्यास टपली आहे असे डॉ. सिंगचे म्हणणे. तर कम्युनिस्ट निवडून आले तर राज्यकारभार रशियाच्या ताब्यात जाईल असे बिगर कम्युनिस्टांचे आरोप.

## नेपाळी कॉंग्रेसचा विजय

निवडणुकांचा निकाल मात्र कित्येकांना अनपेक्षित वाटला. राजाने वाळीत टाकलेल्या नेपाळी कॉंग्रेसला १०९ पैकी ७४ जागा मिळाल्या तर कॉंग्रेसची प्रमुख प्रतिस्पर्धी गुरखा परिषद फक्त १९ जागा मिळवू शकली. टंकाप्रसाद आचार्य, डॉ. के. आय्. सिंग या भूतपूर्व पंतप्रधानांचा सपशेल पराभव झाला. बी. पी. कोइरालां-इतका लोकप्रिय नेता कोणी नाही ही गोष्ट घसघशीतपणे सिद्ध झाली. त्यांना मंत्रिमंडळ बनविण्यास सांगण्याशिवाय राजाला तरणोपाय नव्हता. २७ मे १९५९ रोजी कोइराला मंत्रिमंडळ अधिकारावर आले. लोकशाही समाजवादाला वाहून घेतलेल्या या मंत्रिमंडळासमोर एका मध्ययुगीन अर्थरचनेचे आधुनिकीकरण कर-ण्याचा प्रचंड प्रश्न उभा होता. राजाचा पाठिंबा मिळता तर ही गोष्ट साध्यही झाली असती. पण राजाचे पाठबळ आणि त्याचबरोबर सेना व मुलकी अधि-काऱ्यांचे सहकार्य मंत्रिमंडळास कधीच मिळाले नाही आणि मंत्रिमंडळ अकार्यक्षम आहे या सबबीचा आधार घेऊन राजाला सर्व सत्ता पुन्हा हातात घेता आली.

या पहिल्याच लोकनियुक्त मंत्रिमंडळाच्या अधिकारग्रहणाने भारत व अमेरिका या राष्ट्रांत आनंद व्यक्त करण्यात आला असल्यास नवल नाही. नेपाळी लोक-शाहीने मोठी आशा निर्माण केल्याचे या राष्ट्राच्या नेत्यांनी बोलून दाखविले. भारताला विशेष आनंद होणे स्वाभाविक होते. कारण भारताशी जडलेले खास

संबंध चालू ठेवणेच नेपाळच्या हिताचे आहे ही गोष्ट कोइरालांनी अनेकदा बोलून दाखविली होती. मे १९५९ मध्ये नेहरूंनी काठमांडूला भेट देऊन मित्रत्वाच्या भावनेचा भारतातर्फे पुनरुच्चार केला.

मार्च १९६० मध्ये चीनच्या निमंत्रणावरून कोइराला पेकिंगला गेले. चीनबरोबर आर्थिक सहाय्याच्या करारावर सह्या झाल्या. त्या आधी जानेवारी १९६० मध्ये कोइरालांनी भारताला भेट दिली होती. संरक्षणासाठी भारत व नेपाळ एकत्र यावेत ही कल्पना त्या वेळी त्यांनी धुडकावून लावली होती. पण या बाबतीत पश्चात्ताप करावयास तर लागणार नाही ? अशी परिस्थिती लवकरच निर्माण झाली. कोइराला पेकिंगहून परतले मात्र, चीनने एव्हरेस्ट आणि आजूबाजूच्या प्रदेशांवर हक्क सांगण्यास सुरुवात केली. जून २८ रोजी मस्तांगजवळ सरहद्दीवरील चिनी सैनिकांनी गोळीबार करून एका नेपाळी पोलिसाला ठार मारले व दहा जणांना कैद केले. भारतीय सरहद्द सुरक्षा पथकांवरही हल्ले चालू झालेच होते. आपण शांतताप्रेमी आहोत असा आव चीनला आणावयाचा असल्याने त्याने या प्रसंगाबद्दल नेपाळची माफी मागितली व नुकसानभरपाईही दिली. एव्हरेस्टचा उत्तर बाजूचा उतार फक्त आपल्या प्रदेशात येतो अशीही तडजोड करण्यात आली.

## राजा सत्ताधीश झाला

चीनच्या लाडक्या योजनेस मात्र कोइरालांनी थारा दिला नाही. काठमांडू–ल्हासा रस्ता बांधण्याची कल्पना चिनी नेत्यांच्या मनात फार पूर्वीपासून होती. एप्रिल १९६० मध्ये चौ-एन्-लायने काठमांडूला भेट देताना तिचा पुनरुच्चार केला होता. पण हा रस्ता आर्थिक दृष्ट्या फायदेशीर नाही असे म्हणून कोइरालांनी त्याबाबत बोलणे टाळले.

पण घटनात्मक लोकशाहीचे दिवस संपत आले होते. १५ डिसेंबर १९६० रोजी राजाने लष्कराकरवी सर्व मंत्र्यांना अटक केली आणि पुनश्च सत्ता स्वतःकडे घेतली. मंत्रिमंडळाची पक्षीय स्वार्थ साधण्याची प्रवृत्ती, गटबाजी, लाचलुचपत, कायदा व सुव्यवस्था राखण्यात आलेले अपयश वगैरे कारणे या हालचालीच्या समर्थनार्थ देण्यात आली.

अल्पसंख्य राजकीय पक्षांनी राजाला तात्काळ पाठिंबा दिला. भारतात मात्र नेहरूंनी निराशा व्यक्त केली आणि राजा महेन्द्रचा राग ओढवून घेतला. लोकशाहीवरील निष्ठेचा राजानेच अनेकदा उच्चार केलेला असल्यामुळे आपल्या राज्यपद्धतीला घटनात्मक स्वरूप कसे देता येईल या प्रयत्नास राजा लागला. आयूबखानांची "बेसिक डेमॉक्रसी" आणि सुकार्नोची "गायडेड डेमॉक्रसी" या कल्पनांचे आदर्श राजापुढे होतेच. त्यावरूनच नेपाळची "पंचायत लोकशाही" निर्माण झाली. "ग्रामपंचायतीच्या निवडणुका फक्त सार्वत्रिक पद्धतीने. त्यावरील म्हणजे जिल्हा, विभाग आणि राष्ट्रीय पंचायतींच्या निवडणुका अप्रत्यक्ष पद्धतीने व्हावयाच्या. या पंचायतींना "वर्गीय संघटनांचे"—युवक, किसान, महिला, कामगार

आणि माजी सैनिक यांच्या संघटनांचे – प्रतिनिधी मदत करणार: राजकीय पक्षांना बंदी: पंतप्रधान राजाला जबाबदार. वगैरे.

राजाला मुख्यत: पाठिंबा होता जहाल राष्ट्रवाद्यांचा, नेपाळी काँग्रेसच्या "समाजवादी" सुधारणांना विरोध करणाऱ्यांचा आणि कम्युनिस्टांचा. राजकीय पक्षांच्या प्रमुख पुढाऱ्यांना जरी तुरुंगात डांबण्यात आले होते तरी कम्युनिस्ट पक्ष हा एकच पक्ष असा होता की ज्याच्या बाबतीत या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी झालेली नव्हती. राजा व्यक्ती म्हणून लोकप्रियही होता. विशेषत: राज्यात त्याने काढलेल्या दौऱ्यामुळे त्याच्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाची अशी छाप जनतेवर पडली होती. बाकी राजाच्या धोरणाविषयी सु्ुद्धपणे विचार करण्याइतकी मजल ग्रामीण जनतेची पोचलीच नव्हती.

राजाच्या हातात सत्ता आली आणि टंकाप्रसाद आचार्य पंतप्रधान असताना जे धोरण अवलंबिले जात होते, तेच पुनश्च चालू झाले. सप्टेंबर १९६१ मध्ये राजाने पेकिंगला भेट दिली आणि काठमांडू-ल्हासा रस्ता बांधण्याचा चीनचा आग्रह मान्य


ज्वलंत राष्ट्रवादाच्या
भयानक दीप्तीचा
ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,
४१९ नारायण पेठ, पुणे २.

केला ! " कम्युनिझम काय टॅक्सीमधून येणार आहे काय ?" हा राजाचा टीकाकारांना सवाल होता. या प्रकारच्या धोरणामुळे भारताबरोबरच्या संबंधांना तडा जाऊ लागला. भारतावर जहाल टीका करण्याचे स्वातंत्र्य फक्त नेपाळी वर्तमानपत्रांना देण्यात आले होते !

नेपाळी काँग्रेस दडपून टाकण्याचे धोरण राजाने अवलंबिल्यामुळे पक्षाचे पुष्कळसे कार्यकर्ते भारतात आले व पूर्वीप्रमाणे सशस्त्र क्रांतीची तयारी करू लागले. नेपाळच्या सरहद्दीवरील गावांवर हल्ले झाले. भारत या बंडखोरांना मदत करीत आहे असा आरोप करण्यात आला.

## नवे धोरण

पण या वेळी चीनच भारताच्या मदतीला आला ! ऑक्टोबर १९६२. सरहद्दीवर स्फोट उडाले. नेपाळ–भारत संबंधास एकदम कलाटणी मिळाली. दिल्ली ते काठमांडू, काठमांडू ते दिल्ली अशा राजनैतिक प्रतिनिधींच्या वाऱ्या सुरू झाल्या. नेपाळी काँग्रेसने आपली सशस्त्र मोहीम मागे घेतली. नेपाळी वर्तमानपत्रांचा सूर बदलला. भारतीय सैन्यातील गुरख्यांना परत बोलाविण्याची चीनची मागणी नेपाळने धुडकावून लावली.

१९६३ पासून भारत–नेपाळ संबंधांना एक निराळेच वळण मिळाले. जी दिलजमाई झाली ती परस्परांच्या भूमिका पूर्णपणे समजल्यामुळे. चीनचे शत्रुत्व नेपाळने स्वीकारले नाही आणि ते शक्यही नव्हते. पण राजाचे " अलिप्ततेचे " धोरण चीनकडे जे झुकत होते, ते तसे न झुकता अलिप्ततेच्या सूत्राशी कदाचित् अधिक सुसंगत बनले. सरहद्दीचे संरक्षण करण्यास भारत कितपत समर्थ आहे ? असा प्रश्नही नेपाळच्या मनात डोकावला असल्यास नवल नाही. त्यामुळे चीनशी मैत्रीचे धोरण तर कायम राखायला पाहिजेच, पण इतर राष्ट्राच्या मदतीचीही आवश्यकता विशेष आहे हेसुद्धा नेपाळला पटले. चीनबरोबर जसे घनिष्ठ संबंध जोडण्याचा राजाने प्रयत्न केला, तसाच प्रयत्न त्याने पाकिस्तानबरोबरही केला. पण १९६५ च्या भारत–पाकिस्तान युद्धानंतर भारतीय सैन्याची प्रतिष्ठा नेपाळमध्ये वाढली हे नक्की.

१९५९ साली लोकनियुक्त मंत्रिमंडळ अधिकारावर आले म्हणून नेपाळच्या आर्थिक स्थितीत फरक पडला नाही. १९५९ मध्ये परिस्थिती इतकी बिकट झाली की उपलब्ध असणारा थोडाफार पैसा आज या खात्याकडे तर आज त्या खात्याकडे असा ओढला जाऊ लागला. चीनने दिलेली रोख रक्कम अमेरिकन साहाय्याने चाललेल्या योजनांमधील नेपाळच्या वाटयाचे काम करण्यास वापरण्यात आली. रशियाने हॉस्पिटल बांधण्यासाठी म्हणून जमा केलेल्या दगड–विटा राणी एलिझाबेथ येणार म्हणून काठमांडूत जे बांधकाम अन् दुरुस्त्या सुरू झाल्या त्याला वापरण्यात आल्या !

एप्रिल १९६० मध्ये राजाने अमेरिकेला भेट दिली. त्या वेळी अर्थमंत्री सुवर्ण

समशेर याने एक कोटी पन्नास लक्ष डॉलर्सची मागणी केली आणि ते मिळाले नाहीत तर राज्ययंत्रणा कोसळून पडण्याचा धोका आहे असे अमेरिकेच्या वकिलास कळविले. तांतडीच्या बैठका होऊन नेपाळला ७५ लाख डॉलर द्यावे अशी वकिलातीने शिफारस केली. राजाला मागितलेली सर्व रक्कम मिळाली आणि ही रक्कम खर्च कशी करायची असा प्रश्न उभा राहिला !

- राजाने हातात सत्ता घेतली ही गोष्ट अमेरिकेला पसंत नसली तरी राजाला पाठिंबा देण्याशिवाय गत्यंतर नव्हते, इतका अमेरिकी पैसा नेपाळमध्ये गुंतला होता. नेपाळच्या कित्येक मंत्रालयांचा दैनंदिन कारभार अमेरिकेच्या पैशावर अवलंबून होता. ही मदत नसती तर राज्यच कोलमडून पडण्याचा धोका होता. मग आतापर्यंत केलेले सर्वच श्रम वाया गेले असते.

भारताचीही परिस्थिती अशीच होती. राजाने सत्ता हातात घेतली म्हणून नैराश्य व्यक्त करण्यात जरी आले असले तरी भारताचे आर्थिक साहाय्य कमी न होता उलट वाढले. चिनी आक्रमणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत नेपाळमधील अंतर्गत स्थैर्याला जास्त महत्त्व प्राप्त झाले. राजवट लोकशाहीप्रधान आहे की नाही हा प्रश्न गौण ठरला.

अशी ही नेपाळची कहाणी. नेपाळचे विहंगमावलोकन संपले. आमच्या विमानाने पोखरा विमानतळ नुकताच सोडला होता. आमच्या रांगेतच पलीकडे ब्रिटिशांचा काठमांडूमधील वकील होता अन् त्याच्या शेजारी होता एक साधा खेडूत. आपल्या शेजारी बसलेल्या व्ही. आय. पी. कडे बिचाऱ्याचे लक्षही गेले नव्हते. पुढे बसलेल्या माणसाबरोबर वाकवाकून त्याचा हास्यविनोद चालला होता, मी खिडकीतून बाहेर बघितले, ढगांवर तरंगत हिमशिखरे दूरदूर जात होती. ती भूमीही अशीच हसरी वाटली मला. एका प्रसन्न हसऱ्या जगाचा आम्ही निरोप घेत होतो.

## समाप्त

२७ जुलै १९६८

६

# धर्मराज आणि यक्षप्रश्न

पांडव वनवासात असताना ही गोष्ट घडली. एकदा असे झाले की, पांडवांना फार तहान लागली. जवळच एक तळे दिसले. पहिल्यांदा नकुल भांडे घेऊन पाणी प्यायला गेला. ओंजळीत पाणी घेऊन तो पिणार इतक्यात झाडावरचा अदृश्य यक्ष ओरडला,

"थांब थांब. पाणी पिऊ नकोस. आधी मी विचारतो त्या प्रश्नांची उत्तरं दे. नाहीतर तू ताबडतोब गतप्राण होशील."

तहानलेल्या नकुलाने ते ऐकले नाही. तो पाणी प्याला आणि धाड्कन धरणीवर अंग टाकून पडला. मागाहून सहदेव, अर्जुन, भीम हे भाऊ आले. त्यांचीही तीच गत झाली. यक्षाची प्रश्नपत्रिका सोडवण्यापूर्वीच ते पाणी प्याले. ताबडतोब त्यांचे प्राण गेले.

शेवटी थोरले बंधु धर्मराज आले,

झाडावर बसूनच पान खात यक्ष ओरडला,

"थांब धर्मा, थांब. या तळ्याचं पाणी पिऊ नकोस."

धर्मराजाची स्वारी भारी शांत. राग म्हणजे कसला तो त्यांना ठाऊकच नव्हता. तरीपण त्यांनी विचारलं,

"का बरं? मला तहान लागलेली आहे. पाणी पिण्याचा मला अधिकार आहे. तू कोण मला अडविणार?"

प्रकट होऊन यक्ष तुच्छतेने म्हणाला, "मी या राज्यातला फॉरेस्ट ऑफिसर आहे. या तळ्याची राखण आमच्याकडेच आहे."

"असं? मग झाडावर चढून आपण काय करीत आहात?"

"या झाडाच्या फांद्या कुणीतरी बेकायदा तोडल्या आहेत." यक्ष गंभीरपणे बोलला, "त्या कुणी, कशा, केव्हा व का तोडल्या याची सरकारतर्फे चौकशी चालू आहे. मी चौकशी मंडळाचा सदस्य असल्यामुळे प्रत्यक्ष नुकसान किती झालं हे पाहण्यासाठी इथं आलो आहे. ते असो, या तळ्याचं पाणी तुला पिता येणार नाही."

धर्मराज आश्चर्यचकित झाले. त्यांना वाटले होते की, हा यक्ष काहीतरी विनो-

दाने बोलत असावा. पण त्याचा सरकारी अधिकाऱ्यास शोभेल असा मख्ख चेहरा पाहून त्यांची खात्री पटली की हे प्रकरण सीरिअस आहे.

"पण पाण्याला काय हरकत आहे?" त्यांनी विचारले, "आजपर्यंत कुणी पाणी प्यायला हरकत केल्याचं माझ्या ऐकिवात नाही. ही बंदी कशासाठी?"

यक्ष पहिल्याइतक्याच मख्खपणे बोलला,

"– कारण त्याचं अजून उद्‌घाटन व्हायचं आहे. हे तळं सरकारी आहे. परवाच पुन्हा खोदून साफसफाई केलीय्! आता सबंध तळ्याला फीत लावून ठेवणार आहोत. कुणीतरी मंत्री येऊन ही फीत कापतील. पाण्याची पहिली चूळ ते भरतील. मगच या तळ्याचं उद्‌घाटन होऊन सगळ्यांना पाणी पिता येईल. समजलं? सरकारी हुकूम मोडला तर तुझी तुझ्या बंधूंप्रमाणं स्थिती होईल."

धर्मराज ही हकीकत ऐकून चकित झाले. आपल्याला इकडच्या राज्यातले कायदे माहीत नाहीत हे त्यांनी मोकळेपणाने कबूल केले. तहान तर लागली होती. तळ्याचे उद्‌घाटन होईपर्यंत थांबणे शक्य दिसत नव्हते. या अडचणीतून मार्ग काढा अशी त्यांनी श्री. यक्ष, –फॉरेस्ट ऑफिसर– यांना विनंती केली.

यक्षसाहेब डोके खाजवीत म्हणाले,

"मी माझ्या अधिकारात तुम्हाला परवानगी देईन. आपली प्रायव्हेट. पण त्याआधी मी विचारतो त्या प्रश्नांची उत्तरं देणार काय? बरोबर उत्तरं दिलीत तर परमिशन आहे म्हणून समजा. नाहीतर चालू लागा."

चला, काही मार्ग तर निघाला! अगदीच नकार घेण्यापेक्षा याच्या प्रश्नांची उत्तरं देऊन बघू. लागला खडा तर लागला...असा विचार करून युधिष्ठिरबुवा म्हणाले,

"बोला साहेब, विचारा एकेक प्रश्न"

यक्षसाहेबांनी खिशात हात घालून काही भूर्जपत्रे काढली. हातात बोरू घेऊन त्यांनी सुरुवात केली.

"हं, सांगा. पहिलाच प्रश्न...! कुठल्याही कामाचा पूर्ण विचका उडवण्यासाठी काय करावं?"

धर्मराज डोळे मिटून बोलले,

"त्या कामाचा सांगोपांग विचार करण्यासाठी एक सरकारी समिती नेमावी."

"करेक्ट! दुसरा प्रश्न...देश मोठा की आपला पक्ष मोठा?"

"देशापेक्षा केव्हाही आपला पक्ष श्रेष्ठ. आणि पक्षात आपण स्वतः मोठे."

"कोणता रंग सर्वांत काळाकुट्ट आहे?"

"पांढरा."

"सर्व धंद्यात फायदेशीर धंदा कोणता?"

"देशभक्तीचा."

"कारण?"

" कारण त्याला कसलंही भांडवल लागत नाही, बिचाऱ्या न्हाव्यालासुद्धा वस्तरा-आणि पाण्याची वाटी पाहिजे. देशभक्तीत ही मानगड नाही."

" वरं. शेजारच्या राष्ट्राशी भांडण झालं तर कसं मिटवावं ?"

" ते राष्ट्र जे मागेल ते ताबडतोब देऊन टाकावं. जागतिक शांततेसाठी हे करणं अत्यावश्यक आणि मुत्सद्दे‌गिरीचंच आहे असं नंतर जाहीर करावं, म्हणजे आपली प्रतिष्ठाही कायम राहते."

" आपल्या उद्धाराचा उत्तम मार्ग कोणता ?"

" सहकार. ' बिना सहकार, नही उद्धार ' असं शास्त्रवचनच आहे."

" दान करण्यासाठी सर्वश्रेष्ठ वस्तू कोणती ?"

" आश्वासन."

" खाण्यास योग्य असा सर्वांत चांगला पदार्थ कोणता ?"

" पसा."

" कारण ?–"

" कारण हा पदार्थ कमी खाल्ला तरच बाधतो. भरपूर खाल्ला तर मात्र कस-लाही त्रास होत नाही. उलट आपलं आरोग्य सुधारतं."

यक्ष प्रसन्न झाला. त्याचा चेहरा खुलला.

" आता शेवटचा प्रश्न "–तो म्हणाला, " राज्यात धान्याची समृद्धी व्हावी म्हणून कोणती गोष्ट करावी ?"

" परराष्ट्रांत पाऊस वेळेवर पडावा म्हणून प्रार्थना करावी."

यक्ष फांदीवरून खाली उतरला. त्याने धर्मराजाचा हात बळेबळेच ओढून टाळी दिली.

" वा वा ! युधिष्ठिरा, कॉंग्रेच्युलेशन्स ! राज्यकर्त्याला लागणारं बुद्धिवैभव तुझ्याजवळ आहे यात काही शंकाच नाही. जा पाणी पी. तुझा एक भाऊ मी जिवंत करतो, कुणाला उठवू ते सांग."

धर्मराज ठामपणाने म्हणाले,

" भीम, त्याला जिवंत करा."

" का बरं ? भीमच का ?"

" माझे सगळे बंधु अनुयायी हुशार आहेत. एकटा भीमच थोडा बिनडोक आहे. अनुयायी बिनडोक असावा म्हणजे राजकारणात त्रास होत नाही. शिवाय तो गुंड आहे पक्का. बुद्धीला गुंडगिरीची जोड पाहिजेच. तरच हस्तिनापूरचं राज्य परत मिळेल."

हे उत्तर ऐकून यक्ष भलताच खूष झाला. तो म्हणाला,

" जा जा. मी तुझ्या सगळया भावांना जिवंत केलं आहे. तू कधीही निवडणुकीत पडणार नाहीस अशी मला खात्री वाटते."

यक्ष निघून गेला. पाणी पिऊन पांडव आपल्या वाटेला लागले.

–द. मा. पुराणिक

# रूपवती भार्या शत्रू:!

*पलविंदर कौरची झोप उडाली. मनाच्या संभ्रमित अवस्थेत असतानाच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याकडून पतीचा खून केल्याच्या आरोपावरून तिला पकड वॉरंट मिळाले. घराची झडती घेतली जात असताना पोटॅशियम सायनाईडचे बिल मिळाले. १५ एप्रिल १९५० ला पलविंदरने कोर्टापुढे कबुलीजबाब दिला. जसपालसिंगानं चुकून पोटॅशियम सायनाईड घेतलं. गडबडून गेल्यामुळे तिने मोहिंदरपालच्या मदतीनं ते प्रेत ट्रंकेत कोंबून दूर विहिरीत टाकलं एवढाच तिचा अपराध होता. काही केल्या पलविंदर कौर मोहिंदरपालचा पत्ता लागू देत नव्हती. पोलिस अधिकारी हताश झाले होते. एकूण रागरंग पाहून पलविंदर आपल्या भीषण भविष्यानं हबकून गेली ..............................*

## ५

**ॲडव्होकेट माधव कानिटकर**

अंबाला येथील सेशन्स जज्ज जस्टिस बेदी यांच्यासमोर ८ जानेवारी १९५१ रोजी जसपालसिंग खून खटला सुनावणीस आला ! आपले भवितव्य कठीण आहे, याची जाणीव झालेल्या पलविंदरकौरने अक्षरशः पाण्यासारखा पैसा खर्च करून पंजाब हायकोर्टात जास्तीत जास्त प्रॅक्टिस असलेला (The Leading criminal Lawyer of The Punjab High Court) अत्यंत हुशार वकील बचावासाठी नेमला. सेशन्स कोर्टात अपेक्षेपेक्षा बाहेर चिक्कार गर्दी जमली ! आरोपीच्या लाकडी पिंजऱ्यात शांतपणे बसलेल्या पलविंदरकौरच्या चेहऱ्यात सूचक बदल घडत होते. कधी तो कलहांतरीता भासत होती तर कधी प्रियकराच्या भेटीसाठी आसुसलेली कामूक प्रेयसी ! (Her long lashed eyes manifisted a variety of sentiments and

her handsom face registered in turn injured innocence, righteous anger and seductive charm ! ) कडक पोलीस बंदोबस्तामुळे कोर्टात शांतता होती. सरकारी वकील आणि पर्लविंदरकौरचे बचावाचे वकील आपापली टाचणे काळजीपूर्वक पाहत होते, टिपणं वाचीत होते, कायद्याचे जाडजूड ग्रंथराज दोघांनीही बरेच आणले होते ! इतर पामर लोक त्या दोघांकडे काहीशा आदराने आणि उत्सुकतेने पाहत होते…… इतक्यात जज्जसाहेब येत असल्याचा इशारा शिपायाने दिला ! सर्वांनी उभे राहून न्यायमूर्तींची आदब राखली. बंदोबस्ताच्या पोलिसांनी पुन्हा एकदा धावपळ करून शांतता आणि शिस्त सांभाळली आणि सरकारी वकिलांनी केस ओपन केली ! …पर्लविंदरकौरवर आरोप कोणते आहेत, सरकारतर्फे आपण कोण कोण साक्षीदार तपासणार आहोत याची थोडक्यात माहिती दिली. आरोपीतर्फे कोणी वकील आहेत काय ? याची चौकशी न्यायमूर्तींनी करताच पर्लविंदरकौरच्या वकिलांनी उभे राहून आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिली !

…आणि जसपालसिंग खून खटल्यात सरकारतर्फे आणल्या गेलेल्या साक्षीदारांच्या साक्षी सुरू झाल्या !

माघो आणि चंदर या दोघांनी छाट खेड्यापासून जवळ असलेल्या पडक्या ओसाड विहिरीत कोर्टापुढे असलेली ट्रंक दिसल्याचे सांगितले. पोलिस पाटलांनी ती ट्रंक आपण विहिरीतून वर काढल्याचे सांगितले. पंच आले ! त्यांनी ट्रंकेतले जसपालसिंगाचे कपडे, इतर वस्तू व ट्रंक आपल्या समक्ष पोलिसांनी कबजात घेतल्याचे सांगितले. ट्रंकेतले प्रेत जसपालसिंगाचेच होते असाही पुरावा पुढे आणला गेला ! पुराव्याच्या साखळीचे दुवे एकामागून एक भक्कम जोडले जात होते ! …… आणि पर्लविंदरकौरच्या छातीत धडकी भरू लागली. तिची पूर्वीपासून अशी कल्पना होती की प्रत्येक साक्षीदाराची आपले वकील कसून उलटतपासणी घेतील ! उलटे पालटे प्रश्न विचारतील. साक्षीदाराची साक्ष संपली की तिचे वकील उभे राहून फक्त " No cross " एवढंच बोलून खाली बसत होते ! पर्लविंदरकौरच्या डोक्यातले विचार काहीही असोत. फौजदारी कायदा जाणणारे इतर वकील व स्वतः न्यायमूर्ती बेदी काही न बोलता चेहऱ्यात सूचक बदल करून तिच्या वकिलांच्या बुद्धिमत्तेचे आणि धाडसाचे कौतुक करीत होते ! …… कारण फौजदारी खटल्यात प्रत्येक साक्षीदाराची उलटतपासणी घ्यायची नसते ! आतापर्यंत आलेला एकही साक्षीदार पर्लविंदरकौरने खून केला किंवा त्यानंतर खुनाचा पुरावा नष्ट करण्याचा तिने प्रयत्न केला असे सांगत नव्हता ते कहाणी सांगत होते ते प्रेत कुणाचं सापडलं, कुठे सापडलं आणि कस सापडलं याची ! आरोपी पर्लविंदरकौरबद्दल कोणी काहीच बोलत नव्हता ! त्यांची उलटतपासणी घ्यायची काय जरूर ? ट्रंकेत प्रेत सापडलं असेल, ते जसपालसिंगाचंही असेल. पण फक्त

एवढयावरून आरोपी पर्लविंदरकौर दोषी कशी ठरणार ? "No cross !" हेच बरोबर होतं. बचावाची दिशा बरोबर ठरली होती. सरकारतर्फे आणल्या गेलेल्या एकूण ३८ साक्षीदारांपैकी पहिले १२ साक्षीदार पर्लविंदरकौरच्या वकिलांनी "No cross" या दोन शब्दांनी परतविले होते ! आणि तरीही सरकारी वकील बेहद्द खूष होते कारण इथून पुढच्या साक्षीदारांनी पर्लविंदर-कौरच्या कृत्यांबद्दल प्रत्यक्ष पुरावा व्यवस्थित दिला तर आत्तापर्यंत झालेल्या साक्षी सरकारपक्षाला मदत करणाऱ्याच ठरणार होत्या. त्यांनी सांगितलेल्या हकी-कती खोटया आहेत असं खुद्द बचाव पक्षदेखील म्हणत नव्हता ! No cross ! बचावाचा पवित्रा जितका वर वर सोपा व सरळ वाटत होता तितकाच तो धोका-दायकही होता ! याच विचारांनी आता मात्र सरकारी वकिलांनी हुकमाची पानं काढायला सुरुवात केली ! ज्या सरकारी डॉक्टरांनी जसपालसिंगाच्या प्रेताचे पोस्टमार्टेम केले होते ते डॉक्टर साक्ष देण्यासाठी पिंजऱ्यात शिरले !...... पर्लविंदरकौरच्या वकिलांनी आता मात्र गाऊन सावरला ! दोन्ही वकिलांची 'जुगलबंदी' सुरु झाली ! उजवा पाय जमिनीवर व डावा पाय खुर्चीवर झोकात टेकवून पर्लविंदरकौरचे वकील थोडे झुकले आणि त्यांनी बोचक आणि खोचक प्रश्नांची फैर झाडली ! डॉक्टरची कर्तव्यें काय असतात, पोस्टमार्टेम कसं करतात, पोटॅशियम सायनाईडने मनुष्य मेला तर त्याच्या शरीरावर काय काय बदल घडून आलेले दिसले पाहिजेत ? या बारक्या सारक्या गोष्टींवर त्यांनी इतका भर दिला की ऐकणाराला वाटावं पर्लविंदरकौरचे वकील स्वतः डॉक्टरदेखील आहेत की काय ! वकीलसाहेबांच्या अचूक सरबत्ती पुढे डॉक्टर साहेब नरम पडले. त्यांच्या अंगाला घाम फुटला ! (He cut a sorry figure when defence counsel began to badgar him questions ! ) शेवटी डॉक्टरसाहेबांच्याच तोंडून पर्लविंदरकौरच्या वकिलांनी वदवले की जसपालसिंगाचे पोस्टमार्टेम चालू होते तेव्हा ते बाहेर उभे होते आणि हॉस्पीटलचा भंगी जसपालसिंगाच्या घाणेरडा वास येणाऱ्या प्रेताचे सुटे भाग कापून त्यांच्या हातात देत होता ! पोटॅशियम साय-नाईड या जहरी विषाचे बाह्य शरिरावरचे दृश्य परीणाम त्यांनी स्वतः पाहिले नाहीत ! तसा त्यांच्या रिपोर्टमधे उल्लेख नाही ! हेही वदवले की कदाचित जसपालसिंग दुसऱ्या कुठल्यातरी कारणामुळे मेला असेल !

......अत्यंत अभिमानाने, कर्तव्यपूर्तीच्या आणि विजयाच्या आनंदाने पर्लविंदर-कौरच्या वकिलांनी न्यायमूर्तीकडे पाहिले आणि, "That's all your Honour" एवढं म्हणून खाली बसले !

सरकारी वकील समजले की ज्याला आपण एक्का समजत होतो ती दुरी निघाली ! पण सरकारी वकील सुद्धा साधीसुधी आसामी नव्हती ! त्यांना हे ठाऊक होत की महत्त्वाच्या खून खटल्यात कधी कधी महत्त्वाचा साक्षीदार उलट

तपासणीत कोसळतो ! पण तरीदेखील पुढचं कामकाज नीट केलं तर आरोपीला शिक्षा होतेच होते ! आणि त्यांच्या हातात तर अजून बरीच जड पानं होती !

डॉक्टरांच्या नंतर पर्लविंदरकौरची मोलकरीण लक्ष्मी पिंजऱ्यात शिरली आणि लक्ष्मीने कमाल केली ! सरकारी वकिलांचा अनुभव खरा ठरला ! आपल्या साक्षीत लक्ष्मीने सांगितले की ती गेली ६–७ वर्षे जसपालसिंग साहेबांकडे नोकरीला होती. साहेबांचं बिबीबरोबर (पर्लविंदरकौर बरोबर) लग्न झाल्यानंतर ती त्यांची मुलं सांभाळायचं काम करीत असे. बाईसाहेबांचं वर्तन ठीक नव्हत ! बाईसाहेब आणि त्यांचा आतेभाऊ मोहिंदरपालसिंग यांचा व्याभिचार तिने डोळ्यांनी पाहिला होता. जसपालसिंगाच प्रेत असलेली आणि आत्ता कोर्टापुढे असलेली ट्रंक मोहिंदरपालसिंग आणि आरोपी पर्लविंदरकौर यांनी ओढीत ओढीत दरवाज्यापर्यंत आणल्याचं तसंच, नंतर नोकरांकरवी जीपमध्ये घालून नेल्याचं आणि त्या प्रत्येक वेळी आरोपी पर्लविंदरकौर हजर असल्याचं तिने प्रत्यक्ष पाहिलं होतं ! साहेबांबद्दल तिने चौकशी केल्यानंतर 'साहेब' शिकारीला गेल्येत असं जाणून बुजून तिला सांगितलं गेलं होतं ते पर्लविंदरकौरकडून. त्याच बरोबर 'त्या' ट्रंकेबद्दल कुठे काही बोलू नको असं तिला सांगितलं होतं ते आरोपी पर्लविंदरकौरने ! सरकारी वकिलांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. पर्लविंदरकौरच्या बचावाचे वकील उभे राहिले ! त्यांनी लक्ष्मीला पुष्कळ उलटेपालटे प्रश्न विचारून हैराण केले ! पण लक्ष्मीने इतकी साधी सोपी आणि अचूक उत्तरे दिली की पर्लविंदरकौरचे वकील स्वतःच हैराण झाले ! त्यांना जी उत्तरे अपेक्षित होती ती उत्तरे लक्ष्मी देत नव्हती ! (The witness stood the Cross–Examniation well !) शेवटी रागाने त्यानी अखेरचा प्रश्न टाकला, "हे बघ ! लक्ष्मी ! मी असं म्हणतो की पोलिसांच्या सांगण्यावरून तू खोटी साक्ष देण्याकरता कोर्टात हजर आहेस ! वस्तुतः तुला या खटल्याबद्दल काही ठाऊक नाही ! तू काही पहिलं नाहीस आणि तुला काही माहिती नाही !"

या प्रश्नावर लक्ष्मी चवताळली ! रागारागाने लक्ष्मीने उत्तर दिले, "वाऽरे वाऽऽ म्हणे मी खोटं बोलत्ये ! उलट तुम्हीच खोटं काम करताहात वकीलसाहेब ! मी जे पाहिलं ते खरं सांगितलं ! खोटं सांगून पोलिस काय मला चार चव्वल देणार आहेत !"

कोर्टात हशा पिकला ! न्यायमूर्ती बेदी मात्र गंभीर होते ! त्यानी टायपिस्ट कडे नुसते पाहिले आणि लक्ष्मीचे उत्तर टाईप केले गेले ! "It is not true that I am leading false evidence at the instance of the police !"

……पर्लविंदरकौरच्या वकिलांनी सरकारी वकिलांच्या पायावर पाय मारून कुणाच्याही लक्षात येणार नाही अशा तऱ्हेने त्यांना 'काँग्रेच्युलेशन्स' दिली !

…त्यानंतर पर्लविंदरकौरचे सासरे सरदार रूपसिंग यांनी पोलिस इन्सपेक्टर



**'आरोपी, मग तो सुंदर असो की कुरूप त्याच्या गुन्ह्याचे शासन त्याला झालेच पाहिजे.'**

घरी येऊन गेल्यानंतर पर्लविंदरकौरने आपल्याजवळ जसपालसिंगच्या खुनाचा कबुलीजबाब दिल्याचे सांगितले. मोरिंदरपालसिंग व आरोपी पर्लविंदरकौर या दोघांनी जसपालसिंगाच्या अस्तित्वाबद्दल कसे झुलविले हेही त्यांनी सांगितले! कँपातल्या दोन्ही शिखांनी आणि करमचंदाने 'ती' ट्रंक मोहिंदरपालसिंगच्या सांगण्यावरून आपण कुठे कुठे हलवली, शेवटी विहिरीत कशी टाकली याची साद्यंत हकीकत कोर्टापुढे मांडली! प्रत्येकाने हेही सांगितले की या प्रत्येक वेळी आरोपी पर्लविंदरकौर हजर होती!

सरकारी वकिलांना आपले सर्व साक्षीदार (prosicution witnesses) तपासून झाल्याचे जाहीर केले आणि पर्लविंदरकौरच्या वकिलांनी धूर्तपणे आपल्याला बचावाचे साक्षीदार (Defnce witness) देण्याची इच्छा नाही असे

न्यायमूर्तींना कळविले ! त्यांना ठाऊक होते की बचावाचा साक्षीदारच कधी कधी तपासणीत किंवा उलट तपासणीत फसतो आणि नको ते बोलतो ! आणि सरकार पक्षाचे यश बळकट करून जातो ! पण त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली होती की लक्ष्मी आणि करमचंद यांच्या साक्षी त्यांना धोकादायक होत्या !

...८ दिवसांनंतर न्यायमूर्ती बेदी यांच्यासमोर उभय वकिलांची वक्तव्ये (Arguments) व्हायची होती. सरकारी वकिलांनी आपल्या नेहमीच्या धीम्या पण मजबूत वस्तुस्थितीवर आधारलेल्या घटनांच्या आधारे बोलायला सुरुवात केली:—

"युवर ऑनर ! आरोपी पर्लविंदरकौर हिच्यावर आपले पती जसपालसिंग यांचा खून करणं आणि खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने जसपालसिंगाच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करणं असे आरोप आहेत ! युवर ऑनर ! आरोपी स्त्री ही जितकी सुंदर आहे, तितकीच पाताळयंत्री, व्यभिचारी आणि खुनी आहे, असं संशयातीतरित्या सिद्ध करणारा भरपूर पुरावा आपल्यापुढे आम्ही सादर केला आहे ! खालच्या कोर्टात आरोपी पर्लविंदरकौर हिने 'कबुली जबाब' दिलेला आहे, त्या कबुली जबाबात तिने स्पष्ट कबुली दिलेली आहे की, आपले पती जसपालसिंग यांच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याचा तिने प्रयत्न केला ! एवढेच नव्हे तर त्या कबुलीजबाबातील तो भाग खरा आहे, असं आपल्याला लक्ष्मी आणि करमचंद यांच्या साक्षीमधून दिसून येईल. (There is no reason to disbelieve in them !) आरोपी पर्लविंदरकौरचा त्याच कबुलीजबाबात बचाव मात्र असा आहे की, तिचा पती जसपालसिंग हा चुकून पोटॅशियम सायनाईड पिऊन अपघाताने मेला ! युवर ऑनर कुठलाही आरोपी 'मी खून केला' असा कबुली जबाब सहसा देत नाही ! तो काही ना काही तरी बचाव हा घेतोच ! आरोपी पर्लविंदरकौर हिचा बचाव कितपत विश्वासार्ह आहे हे ठरविण्याचा अंतिम अधिकार युवर ऑनर !, आपलाच आहे ! पण माझं मत मात्र असं आहे की, आरोपी पर्लविंदर आणि तिचा आतेभाऊ मोहिंदरपालसिंग यांचे अनैतिक संबंध होते, ही गोष्ट सिद्ध करणारा भरपूर पुरावा या कोर्टापुढे आलेला आहे—तो मोहिंदरपालसिंग की जो या खटल्यातदेखील आरोपी आहे आणि खुनाला वाचा फुटल्यावर जो फरारी झालेला आहे ! युवर ऑनर जसपालसिंग अपघाताने मेला असता तर ती घटना पर्लविंदरकौरने तिच्या सासऱ्यापासून आणि नोकरांपासून दडवून ठेवली नसती ! कर नाही त्याला डर कसली ? पुरावा मात्र असं दाखवतो की, "त्या ट्रंकेबद्दल कुठे काही बोलू नको" असं ती नोकरांना सांगते ! "आपले पती शिकारीला गेलेत" अशी धादांत खोटी बातमी उठवते ! आणि सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती ट्रंक विहिरीत टाकतेवेळी तिचा आवाज होऊ नये म्हणून ही बाई बंदूक उडवते ! ट्रंक विहिरीत टाकणाऱ्या हमालांना हमालीचे पैसे दिले ते आरोपी पर्लविंदरकौरने ! तसा स्पष्ट पुरावा आहे युवर ऑनर !...आणखी एक मुद्दा

विचार करण्यासारखा आहे! युवर ऑनर! ज्या दिवसापासून जसपालसिंग बेपत्ता झाला—ज्या दिवशी त्याचा खून झाला—त्याच्या आदल्या दिवशी मोहिंदरपालने—आरोपीच्या नावाने—पोटॅशियम सायनाईड विकत आणले! त्याची पावती (cash memo) आरोपी पर्लविंदरकौरच्या शयनगृहात सापडली! तसा पंचनामा आहे आणि तोदेखील मी सिद्ध करून दाखवला आहे! हिच्या चेहऱ्याकडे पाहा एकदा युवर ऑनर! हिचे गुन्हे हिच्या चेहऱ्यावरदेखील स्पष्ट दिसताहेत! ज्या पद्धतीने हिने व मोहिंदरपालसिंगने 'ती' ट्रंक हलविली ती पद्धत—ते वर्तन युवर ऑनर! हेच दाखवितात की, जसपालसिंगाचा खून आरोपी पर्लविंदरकौरनेच केला! व्यभिचारासाठी केला! एवढंच नव्हे तर प्रत्यक्ष पतीचा खून करून त्यानंतर खुनाचा पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने ह्या बाईने पतीच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला! तसा तिचाच कबुलीजबाब आहे! (The death of Jaspal-singh was attributed to an accidental mistake, but your Honour! The manner in which the dead body was disposed off is clearly indicative of acute sense of guilt!) युवर ऑनर! आरोपीचं दैवी सौंदर्य हा एक दैवदुर्विलास आहे! आरोपीला 'स्त्री' म्हणण्याचीदेखील मला लाज वाटते! पुरुषालादेखील जमणार नाही असा भयंकर हिडीस गुन्हा या सुंदर मुखड्याने व्यभिचारासाठी केला! युवर ऑनर! न्यायासनापुढचा आरोपी, मग तो सुंदर असो किंवा कुरुप! पुरुष असो किंवा स्त्री! त्याच्या गुन्ह्याचे शासन त्याला व्हायलाच पाहिजे! या खटल्यात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष (Direct & circumstanstial!) आरोपी पर्लविंदरकौरनेच जसपालसिंगाचा खून केला ही गोष्ट संशयातीतरित्या सिद्ध होत आहे! युवर ऑनर! आरोपी 'स्त्री' असली तरीदेखील ती दयेला पात्र नाही! समाजाच्या स्वास्थ्यासाठी, सांसारिक जीवनाच्या पावित्र्याच्या रक्षणासाठी, शिक्षणाच्या संस्काराच्या आदरासाठी आरोपी पर्लविंदरकौरला जसपालसिंगाचा जाणून बुजून आणि हेतुपुरस्सर खून केल्याबद्दल फाशीची शिक्षा द्यावी, अशी माझी प्रार्थना आहे!

सरकारी वकिलांचे इंग्रजीतील भाषण संपले! ...त्यांची 'प्रार्थना' सुशिक्षित पर्लविंदरकौरने ऐकली आणि तिच्या अंगाला दरदरून घाम फुटला. हातापायांतले अवसान नाहीसे झाले! फाशी!...

काकुळतीने आणि केविलवाण्या आशेने तिने तिच्या वकिलांकडे पाहिले. न्यायमूर्ती बेदी यांनी भुवया उंचावून "तुमचं काय म्हणणं आहे?" अशा अर्थाने पर्लविंदरकौरच्या वकिलांकडे पाहिले आणि कौतुकास्पद आत्मविश्वासाने पर्लविंदरकौरचे वकील बचावाचे भाषण करण्याकरता उभे राहिले!

"प्लीज युवर ऑनर! माझ्या सरकारी वकील मित्रांनी त्यांच्या भाषणात एका महत्त्वाच्या मुद्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष केलेलं दिसतं की या खटल्यात एकंदर

आरोपी दोन आहेत ! एक माझी अशील पर्लविंदरकौर आणि दुसरा मोहिंदरपाल-सिंग–जो आत्ता या माननीय कोर्टापुढे नाही ! युवर ऑनर असंही घडलं असण्याची शक्यता आहे की जसपालसिंगाचा खून मोहिंदरपालने केला. आपल्या हातून काय घडलं आहे याची जाणीव झाल्यावर त्याने आपल्या बहिणीकडे पुढच्या कामासाठी मदतीची याचना केली आणि केवळ भीतीमुळे तिला त्याची साथ खुनानंतर करावी लागली ! आरोपी मोहिंदरपालसिंग पोलिसांना मिळत नव्हता–मिळाला नाही आणि त्यामुळे त्यांनी पर्लविंदरकौरला या खटल्यात गोवली ! (It was a good strategy to direct the attention of the court by throwing the spot light of suspision on the absconding man) समाजाचं स्वास्थ्य आणि वैवाहिक जीवनाचं पावित्र्य आम्हीही मानतो (!) पण त्याचा अर्थ असा नव्हे की या सुंदर शब्दांचा उपयोग करून एका निष्पाप विधवेला (!) फासावर लटकवावं ! या खटल्यात आरोपी पर्लविंदरकौरच्या विरुद्ध कुठलाही प्रत्यक्ष भक्कम आणि विश्वासार्ह पुरावा नाही ! जो काही 'पुरावा' पुढे आला तो कशाबद्दल ? तर आरोपी पर्लविंदरकौर आणि मोहिंदरपाल सिंग यांच्या संशयास्पद संबंधांबद्दल ! खुनाबद्दल नव्हे ! एवढंच नव्हे युवर ऑनर ! सरकार पक्षाचे साक्षीदारच आरोपी पर्लविंदरकौरला निर्दोषी ठरवीत आहेत ! काय म्हणतो पुरावा ? पोटॅशियम साय-नाईडची बाटली कोणी विकत आणली ? मोहिंदरपालने ! पर्लविंदरकौरने नव्हे ! बरं, तेच विष जसपालसिंगाला देण्यात आलं आणि ते देखील आरोपी पर्लविंदर-कौरने असा पुरावाच नाही ! (There is absolutely no evidence on record to prove that the alledged poison was administered by the accused !) सरकारी डॉक्टर आपल्या साक्षीत असं म्हणतात की 'जसपाल-सिंगाला कदाचित् दुसऱ्या कुठल्यातरी कारणामुळे मृत्यू आला असेल !' दुसरा कुठलाही साक्षीदार या विषाबद्दल काहीच बोलत नाही. (The witnessess had attributed no part to Palvindarkaur in the procurement or administration of the poison) अशा परिस्थितीत पर्लविंदरकौरने खून केला असं म्हणणं हा अन्याय आहे ! माझ्या वकीलमित्रांनी माझ्या अशीलाच्या 'कबुलीजबाबा'वर बराच भर दिला आहे ! युवर ऑनर ! पण त्यांचं म्हणणं मात्र असं आहे की त्यातला काही भाग खरा आहे आणि काही भाग खोटा आहे ! युवर ऑनर ! सरकारी वकील असा भेद जाणून बुजून करतील पण न्यायमूर्ती करणार नाहीत अशी माझी खात्री आहे ! तो कबुलीजबाब एक तर संपूर्ण खोटा असेल किंवा संपूर्ण खरा असेल ! आरोपी पर्लविंदरकौरचा कबुलीजबाब हा संपूर्ण खोटा आहे असं या नामदार कोर्टाचं मत असेल तर प्रश्नच मिटला ! पण तो संपूर्ण खरा आहे असं वादापुरतं आपण धरून चालू तरीदेखील काही बिघडत नाही ! कारण, "होय ! मी माझ्या पतीचा खून केला !" असं तो कबुलीजबाबात कुठेही म्हणत

नाही ! ती म्हणते, 'माझा पती अपघाताने मेला '-आणि तिचं हे म्हणणं खोटं आहे आणि बाकीचं मात्र खरं आहे असं धरून चालणं हा अन्याय आहे ! पुरावा असेही दाखवतो की आरोपी पर्लविंदर कौर आणि तिचे सासरे सरदार रूपसिंग यांचं वाकडं होतं आणि आहे ! आणि अशा व्यक्तीकडे म्हणे पर्लविंदरकौरने 'मी खून केला' असं आपणहून जाऊन सांगितलं ! काय जरूर होती आरोपी पर्लविंदरकौरला असं करण्याची ? सरदार रूपसिंगाची साक्ष विश्वासार्ह नाही युवर ऑनर ! मोहिंदरपालसिंगच्या नावावर असलेली विषाच्या बाटलीची पावती माझ्या अशीलाच्या शयनगृहात सापडली यात अस्वाभाविक असं काही आहे का ? सरकारपक्षाचे साक्षीदारच असं सांगतात की ते विष आणण्याचा हुकूम मोहिंदरपालने दिला होता ! तो आमच्या अशीलाकडे काही दिवस राहत होता ! नंतर जाऊन येऊन होता ! भावाचे एखादे चिटोरे बहिणीकडे (!) सापडले एवढ्यावरून भलता निष्कर्ष काढणं धोकादयक आहे युवर ऑनर !

... कोर्ट गंभीर मुद्रेने बचावाचे भाषण ऐकून घेत होते. महत्त्वाचे बचावाचे मुद्दे लिहून घेत होते ! इंग्रजी वाक्यांच्या फैरीतून बुद्धिमत्ता ओसंडत होती ! शब्दांच्या फेकीने, तर्कशुद्ध युक्तिवादाने बचावाच्या वकिलांनी उपस्थितांना मारून टाकले जात होते ! बचावाचे भाषण पुढे चालूच राहिले...

"युवर ऑनर ! बाकीचे साक्षीदार कोण ? तर दोन हमाल ! आणि दोन नोकर ! की जे खुनाबद्दल काहीच बोलत नाहीत ! आरोपी पर्लविंदरकौरच्या विरुद्ध म्हणून पुढे आलेल्या पुराव्याचा बारकाईने विचार केला तर सहज लक्षात येतं की तिच्यावरचा खुनाचा आरोप संशयातीतरीत्या सिद्ध झालेला नाही. (Beyoud the reasonable doubt) ... राहता राहिला आणखी एक आरोप ! जसपालसिंगाच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केल्याचा ! ज्याचा मृत्यूच आकस्मिक, अनपेक्षित, धक्का देणाऱ्या अपघाताने झाला आहे (!) अशा व्यक्तीच्या प्रेताची विल्हेवाट लावण्यामागे हेतू काही नव्हता. होती ती भीती ! फक्त भीती ! सासऱ्याशी असलेलं पर्लविंदरकौरचं वैर सरकारपक्षानेच सिद्ध केलं आहे. तशा त्या अचानक मृत्युमुळे आरोपी पर्लविंदरकौर घाबरली असावी... तिला पुढचं काही सुचेनासं झालं ! खून लपविण्याच्या हेतूने तिने ते कृत्य केलं असा पुरावा नाही ! फिर्यादीपक्ष आपण स्वतःच काय म्हणतो याची खातरजमा न करता २०१ कलम लावून मोकळा झाला ! ... आणि म्हणून युवर ऑनर ! माझी अशी अशी प्रार्थना आहे की इं. पि. को. कलम ३०२ आणि २०१ या दोन्ही आरोपांतून आरोपी पर्लविंदरकौरची निर्दोष मुक्तता करण्यात यावी !"

न्यायमूर्ती बेदी न्यायासनावरून उठले, तेव्हा त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली होती की घडलेल्या एकंदर घटनांचा विचार करता जसपालसिंगाचा अमानुष खून

आरोपी पलविंदरकौर आणि फरारी मोहिंदरपालसिंग या दोघांनी मिळून केला आहे यात शंकाच नाही! पलविंदरकौर आज इतके दिवस त्यांच्या समोर लाकडी पिंजऱ्यात बसत होती. तिच्या चेहऱ्याकडे–सौंदर्याच्या त्या विशिष्ट ठेवणीकडे-नुसतं पाहिलं तरी तिच्या गुन्ह्याची स्पष्ट कबुली तिचं अनुपम सौंदर्य देत होती! (I suspect that Palvindarkaur's good looks were the most telling peace of evidence against her...) पण... पण सेशन्स जज्जाला असं म्हणून चालणार नव्हतं! न्यायदेवता आंधळी असते! न्यायदेवता निकाल देते तो पुढे आलेल्या पुराव्यावरून! न्यायदेवतेला काय 'वाटतं' यावरून नव्हे! न्यायमूर्ती बेदींनी निकालाची तारीख मुक्रर केली आणि आपल्या चेंबरमध्ये गेल्यावर कितीतरी वेळ ते खटल्याचे कागदपत्र काळजीपूर्वक तपासीत विचार करीत राहिले की आपल्याला 'वाटतं' त्या प्रमाणे पलविंदरकौरवर खुनाचा आरोप संशयातीतरीत्या सिद्ध करण्याइतपत पुरावा या खटल्यात सरकारपक्षाने आणला आहे का?

(अपूर्ण)

## □ स्लोव्हाकियात हिंदी मातृभाषा!

व्हिएटनाममध्ये काय करायला पाहिजे याबद्दलचे आपले विचार पत्रकाराना मुलाखत देताना डॉ. अलेक्स बेब्लर यांनी व्यक्त केले. या चतुरस्त्र संस्कृतज्ज्ञ, भारतप्रेमी विचारवंताची आणखी काही मते:

इंडोनेशियन भाषेत संस्कृत : हल्ली प्रचारात असलेल्या इंडोनेशियन भाषेत खूपच संस्कृत शब्द आहेत.

स्लोव्हाकियात हिंदी : स्लोव्हाकियातील जिप्सी जमाती जवळ जवळ शुद्ध हिंदी बोलतात.

बौद्धमत : बौद्धमत म्हणजे मूलत: नागरी उच्चवर्गीयांची जमीनदार वर्गाविरुद्ध चळवळ होती.

हिप्पी : बीटल्स आणि हिप्पी प्रगतिवादी व शांततावादी असून अतिरेकी राष्ट्रवादाच्या विरुद्ध आहेत. ते राजकारणविरोधी व युद्धविरोधी आहेत.

## □ भीक घालण्याची ऑलिंपिक शर्यत

पाकिस्तानाच्या मानाने हिंदुस्थान खूपच सुधारलेला आहे, याचा मला नेहमीच अभिमान वाटत आलेला आहे. हा अभिमान द्विगुणित करणारी एक घटना नुकतीच घडली. मागे दिल्लीतल्या भिकाऱ्यांनी एक युनियन काढायचा विचार केला होता, तेव्हा त्यांच्यासाठी अस्मादिकांनी काही मागण्याही तयार केल्या होत्या. आता या भारतीय भिकाऱ्यांच्या पावलावर पाऊल टाकून पाकिस्तानातल्या भिकाऱ्यांनीही म्हणे एका सभेत आपल्या मागण्या मांडल्या आहेत. त्यातली पहिली मागणी म्हणजे कमीत कमी १५ पैसे भीक मिळाली पाहिजे अन् दुसरी म्हणजे दार ठोठावल्यापासून ४५ सेकंदांत भीक मिळाली पाहिजे. इन्शाल्ला ! महागाई वाढल्याने भिकाऱ्यांच्या भिकेत महागाई भत्ता असावा, अशी मी मागे सूचना केली होती, पण पाक भिकाऱ्यांनी याच्याही पुढे जाऊन बेसिक सॅलरीत डियरनेस अलाउन्स मर्ज करण्याचा थेट सरकारी तोडगा काढलेला दिसतो. आता इंडेक्स ऑफ् लिव्हिंग असतो, त्याप्रमाणे इंडेक्स ऑफ बेगिंग असतो की काय याची मला कल्पना नाही, पण १५ पैशांचा हा किमान बिंदू वाढत्या जीवन–खर्चानुसार वाढत जाणार आणि वाढलेला प्रत्येक पैसा पाक भिकाऱ्यांचे वाढते जीवन–मान दाखविणार यात शंका नाही. दुसरे म्हणजे कमीत कमी किती भीक घातली पाहिजे, हे ज्याप्रमाणे ठरविण्यात आले आहे, त्याप्रमाणे जास्तीत जास्त किती भीक असावी, याचा विचार–विनिमय भिकाऱ्यांच्या हायकमांडने केलेला दिसत नाही. मला वाटते, केवढी भीक घालण्यास "जन्नत" मिळण्याची गॅरंटी आहे, याचा निर्देश प्रस्तुत ठरावात असता तर बरे झाले असते.

आणि ४५ सेकंदांची मुदत म्हणजे तर भीक घालणाऱ्या मंडळींना "घटका जाती पळे जाती" असा गंभीर इशाराच आहे. भिकाऱ्यांसारख्या बिझी मंडळींचा खोळंबा झाल्याने भीक मागण्याच्या पब्लिक सेक्टर व्यवसायात किती मॅन–अवर्स (शिवाय वूमन–अवर्स अन् चाइल्ड–अवर्सही) फुकट जात असतील याचा कोणी हिशेब लावला आहे काय ? हा वेळेचा अपव्यय थांबलाच पाहिजे. तेव्हा भीक मागणाऱ्यांनी

भीक घालणाऱ्यांना असा अल्टिमेटम् देणे योग्यच आहे. आता अडचण एवढीच की, एखादा आळशी दाता ४५ सेकंदांच्या वर किती सेकंद उशीर लावतो याचा हिशेब ठेवण्यासाठी प्रत्येक पाक भिकाऱ्याला खिशात (की लंगोटीत ?) स्टॉपवॉच बाळगावे लागेल. अर्थात् इतका काटेकोर हिशेब ठेवायचा म्हणजे साधी घड्याळे काय कामाची ? मला वाटते ऑलिंपिक सामन्यासाठी जी बिनचूक घड्याळे वापरली जातात तीच या महत्त्वाच्या कामासाठी योग्य आहेत. बरे, पण जे भीक घालणारे ४५ सेकंदांपेक्षा अधिक उशीर लावतील त्यांना त्यांच्या अक्षम्य दिरंगाईची शिक्षा नको काय ? माझी अशी सूचना आहे की, जेवढा उशीर होईल त्याच्या दर सेकंदागणिक एक पैसा असा दंड वसूल करण्यात यावा. उलट जे ४५ सेकंदांच्या आत भीक घालण्याचा विक्रम करून दाखवतील त्यांना एक्स्ट्रॉ पुण्याचा बोनस मिळावा हे ओघानेच आले. पण जे नापाक लोक पाक भिकाऱ्यांना सबंध एक मिनिटापेक्षा अधिक तिष्ठत उभे करतील त्यांना खुदाच्या घरी कधीच क्षमा मिळणार नाही त्यांनी पूर्णपणे लक्षात ठेवावे.

## रेफ्रिजरेटरमधले आइस-कोल्ड दारिद्र्य

परवा व्यंगचित्रकार लक्ष्मण यांचा अमेरिका-यात्रेवरचा लेख वाचला. त्यात त्यांनी लिहिले आहे की त्यांना भेटलेला एक हिप्पी म्हणाला : "दरिद्री राहणे ही माझी एकमेव इच्छा आहे. माझ्याकडे टेबल-खुर्च्या नाहीत, आम्ही रेफ्रिजरेटरवरच बशा ठेवून खातो. माझा इलेक्ट्रिक ब्लेंडर किंवा इतर उपकरण बिघडले तर ते मी टाकून देत नाही, दुरुस्त करून पुन: वापरतो.—आणि सर्वांत कळस म्हणजे माझी मोटार पाच वर्षांची जुनी झाली असून ते मी अजून बदललेली नाही." बापरे! एवढ्या दु:सह दारिद्र्याचे असिधारा व्रत जाणूनबुजून स्वीकारणाऱ्या कठोर-हृदयी माणसाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. खरे म्हणजे अमेरिके सारख्या देशात दरिद्री राहणे केवढी कठीण गोष्ट आहे. जरा माणसाचे दुर्लक्ष झाले की तो लगेच पैशाच्या पुरात वाहून जायचा अन् नकळत एखाद्या कारखान्याचा मालक व्हायचा. मला वाटते आपण भारतीयांनीही उगीच आर्थिक सुबत्तेचा हव्यास न धरता प्रस्तुत हिप्पीप्रमाणे दारिद्र्याचे व्राण घ्यावे. आपणही घोर प्रतिज्ञा करू या—आम्ही रेफ्रिजरेटरवरच ताट मांडून जेवू, दरवर्षी नवीन ब्लेंडर घेणार नाही, इतकेच काय पण मोटारही किमान पाच वर्षे तीच वापरू. परमेश्वरा, केव्हा बरे आम्हा श्रीमंत भारतीयांना हे अमेरिकन दारिद्र्याचे दिवस दाखवशील ?

O

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## ऑगस्ट महिन्याचे भविष्य

**मेष** : चौथा मंगळ एवढेच एक शल्य या महिन्यात जाणवेल. या मंगळाशिवाय अन्य ग्रहांची तुमच्यावर कृपादृष्टी असल्यामुळे, तुमच्या प्रगतीची गती मंदावणार नाही. परिश्रम फार करावे लागतील, खर्चातही बरीच वाढ होईल. पण अपेक्षित यश पदरी पाडून घ्याल.

संपूर्ण यशाचे आणि स्वास्थ्याचे दिवस हे नसले तरी उणीव कशातही भासू शकणार नाही. धावपळ धडपड ही साडसातीत अपेक्षित असतेच. आताच काय यापुढही ती करावी लागणारच आहे.

दुसरा पंधरवडा अधिक प्रगतीचा, राजकीय प्रतिष्ठेत वाढ करणारा जाणवेल. १८ ऑगस्टच्या सूर्य-शनी-त्रिकोणापासून तुमचे महत्त्व जगाच्या निदर्शनास येऊ लागेल.

दि. ५ ते ८, १५ ते २२, २५ ते २८ ऑगष्ट या कालांत आपल्या अनेक समस्या सुटू लागतील.

**वृषभ** : मंगळ पराक्रमात, तुमच्या प्रगतीची ग्वाही द्यायला एवढी ग्रहस्थितिही बस्स आहे ! या काली थोड्याशा प्रयत्नानेही तुम्ही अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही सहज शक्य आहेत हे जगाला दाखवू शकाल.

नव्या व्यवसायधंद्यात पदार्पण घडेल. आगष्ट महिन्याचे पहिले १५–२० दिवसच अधिकाधिक लाभाचे, प्रगतीचे, अपेक्षासाफल्याचे जाणवतील.

दुसऱ्या पंधरवड्यातही अपेक्षेप्रमाणे सारे काही घडवून आणता येईल, पण प्रयत्नांची शिकस्त करायला हवी.

दूरचे प्रवास घडतील, अनेक नवे कार्यक्रम यशस्वी करून दाखवावे लागतील, थोरांचे सहकार्य घ्यावे लागेल. साडेसातीत थोडेफार असे केल्याशिवाय भागतच नाही.

दि. ७ ते ११, १७ ते २३, २७ ते ३१ अपेक्षेपेक्षाही अधिक यश लाभेल.

**मिथुन** : तुमच्या राशीमधून बऱ्या वाईट साऱ्याच ग्रहांचे उच्चाटन झाले. आता तुमच्यावर कोणाचेही दडपण येणार नाही. तुम्ही आपल्या मनाप्रमाणे करायला पूर्ण मुख्त्यार आहात.

पहिला पंधरवडा भविष्यकालीन योजना आखण्यात खर्ची पडेल तर दुसऱ्या

पंधरवड्यात त्या सान्या योजना आकार घेऊ लागतील. दुसऱ्या पंधरवड्यात विशेषत: १८ ते २२ ऑगस्ट या कालात तुमच्या व्यावसायिक प्रगतीला अक्षरश: उधाण यायला लागेल.

कलासाहित्याच्या प्रांतांत विशिष्ट स्थान मिळवाल. यांत्रिक विद्युत क्षेत्रात संशोधनात्मक कार्य कराल, प्रगतीची क्षेत्रे हस्तगत कराल.

दि. ३ ते ५, १८ ते २२, २६ ते ३० या कालात नेत्रदीपक यश पदरी पडेल.

**कर्क :** अंतरिक्षातील बरेचसे मोठाले तेजोगोल तुमच्या राशीच्या आगेमागेच संचरत असल्यामुळे त्यांच्या साहचर्याचा तुमच्याही चारित्र्यावर परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ?

तुमचे सामाजिक महत्त्व वाढीस लागेल, प्राप्तीत आणि खर्चातही कमालीची वाढ होईल, नव्या फार मोठ्या जबाबदाऱ्या अंगावर पडतील. हे दिवस तसे स्वास्थ्याचे नसले तरी प्रगतीची गती वाढविणारे निश्चितच आहेत.

दुसऱ्या पंधरवड्यात आपली सारी कामे गती घेऊ लागतील, वैद्यकीय व स्थापत्य शास्त्रात संशोधन विभागात—शेती व्यवहारात कधी कुणाला न मिळालेले यश आपणांस मिळू शकेल.

दि. ३ ते ७, १२ ते १९, २१ ते २६ अनेकांच्या सहकार्याने नव्या क्षेत्रांत यशस्वी व्हाल.

**सिंह :** मंगळ बारावा—काही काल सूर्यही तिथेच. हे ग्रह काही तुम्हाला सहजासहजी यश मिळू देणार नाहीत. अवाढव्य खर्च समोर उभा राहील, त्यांची तोंडमिळवणी करण्यासाठी याचना-वंचना करण्याचेही प्रसंग ओढवतील, इष्टमित्र—सहकारी कोणीच मदतीला धावून येणार नाहीत. आणि या सर्वांमुळे आपली मनस्थिति बिघडेल. आरोग्यही ठीक राहणार नाही.

दुसऱ्या पंधरवड्यात थोडेफार यश पदरी पाडून घेऊ शकाल. सांपत्तिक अडचणी बऱ्याच प्रमाणात निभावल्या जातील. व्यावसायिक मदभेद मिटवण्यात यशस्वी व्हाल. मुख्यत: १७ ते २१ ऑगस्ट या कालात बऱ्याचशा गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडून येतील.

दि. ३ ते ७, १७ ते २३, २६ ते २९ या कालात बऱ्याचशा गोष्टीत यश यावे.

**कन्या :** अनेक विशालग्रह लाभस्थानी आलेले असल्यामुळे, ते ग्रह तुमच्या अपेक्षा पूर्णांशाने सफल करतील असा भरंवसा वाटतो.

पहिल्या पंधरवड्यांत माझ्या या म्हणण्याचा आपणांस हातोहात प्रत्यय यायला लागेल.

नोकरीतील प्रगती डोळ्यासमोर दिसू लागेल, व्यापारधंद्यांत फार मोठ्या प्रमाणात उलाढाल्या घडून यायला लागतील. दुसरा पंधरवडाही अनुकूलच आहे. पण हे लाभाचे प्रमाण काहीसे कमी जाणवेल, इतकेच.

या महिन्यापासूनच राजकीय क्षेत्राशी तुमचा घनिष्ट संबंध यावा. परराष्ट्रीय राजकारणांत–अर्थशास्त्रीय व्यवहारात–तुमचे स्थान निश्चितच उंचावेल.

दि. ४ ते ९, ११ ते १९, २७ ते ३१ या काली अपेक्षेबाहेर यश पदरी पडेल.

तूळ : अधिकाधिक चांगल्या स्थानामधून अंतरिक्षातील अनेक ग्रहांचे संचलन सुरू झालेले आहे. ते तुमच्या प्रगतीला आणखी गतिमान करतील.

हा सर्व महिना–विशेषत: दुसरा पंधरवडा–अत्युत्तम प्रगतीचा म्हणून चिरंतन स्मृतीचा जाणवेल. आयुष्यावर आपल्या अस्तित्वाचा ठसा उमटवून जातील अशा प्रगतीला उत्थान देणाऱ्या घटना भराभर घडून यायला लागतील. कलाक्षेत्रात दीर्घ मुदतीचे आकर्षक करारमदार होतील, साहित्यांत जगाला मार्गदर्शक ठरेल असे अनन्यसाधारण लेखन आपल्या हातून घडेल. पैसा अनेक मार्गांनी हाती येईल, आपल्या प्रतिष्ठेची उंची हिमालयासारखी उत्तुंग वाटू लागेल.

दि. ५ ते ८, १५ ते २२, २४ ते २९ नोंद करण्यासारखे महत्त्वाचे दिवस.

वृश्चिक : मंगळ भाग्यात आला, आणि त्याने तुम्हा साऱ्या वृश्चिक राशी व्यक्तींना सांगून टाकले की, आता तुमचा सारा अनिष्ट काल इतिहासजमा झाला.

मंगळाच्या जोडीला रवि-शुक्रादी अनेक ग्रह असल्यामुळे या वर्षातील अधिकाधिक प्रगतीचा काल हाच ऑगस्ट महिना असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरू नये.

नोकरीधंद्यात फार मोठी प्रगती अनपेक्षितपणे घडेल. स्थानांतर–स्थित्यंतराच्या योजना दृष्टिक्षेपात येतील. नवे क्षेत्र हाती गवसेल, तुम्हांपैकी कित्येकांना परदेशास जाण्याचीही संधी लाभेल.

दुसरा पंधरवडा तर तुमच्या वैभवावर सुवर्णकलश चढवील. स्थावराचा प्रश्न मिटेल. वाहनाची विवंचना मिटेल.

दि. ३ ते १०, १२ ते १९, २२ ते २८ या कालावरच सारे लक्ष केंद्रित करा.

धनु : मंगळ आणि कंपनी आपल्या अष्टमस्थानी असल्यामुळे काही दिवस तुम्हांला त्रासात, अडचणीत काढणे भाग आहे. या हट्टवादी ग्रहापुढे कुणाचेच काही चालत नाही.

प्रकृती, पैसा आणि सामाजिक प्रतिष्ठा या सर्वांवर थोडाफार परिणाम होणारच. दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य भाग्यस्थानी प्रवेश करताच तुमच्या मनावरचा ताण निश्चितच कमी होईल. परिश्रमाने का होईना सारी कामे गती घेऊ लागतील. इष्ट मित्रांची ऐनवेळी मदत मिळेल, हुकलेल्या संधी पुन्हा भेटू लागतील. बदली-बढतीची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतील. नव्या घरी वास्तव्य घडेल. सर्वत्र प्रसन्न वातावरण दरवळू लागेल.

दि. १ ते ७, १३ ते १९, २४ ते २९ या काली प्रत्येक कामे यशस्वी ठरू लागतील.

मकर : सप्तमातील मंगळाने तुम्हांला आव्हान दिले आहे. त्याला प्रत्याव्हान

देण्याच्या भानगडीत पडू नका. काहीसे जुळते मिळते घेण्याची तयारी दाखवलीत तरच तुमचा निभाव लागेल.

पहिल्या पंधरवड्यांत तर तुमच्या सहनशीलतेची परीक्षाच ठरेल. त्या परीक्षेत आपण निश्चित उत्तीर्ण व्हाल; पण त्यासाठी आपणास अविश्रांत परिश्रम करावे लागतील.

भागीदारी चिघळू लागल, कुटुंबात संघर्षाच्या ठिणग्या उडू लागतील, तुमची प्रगती क्षणोक्षणी रोखली जाईल. क्षुल्लकशा कारणानेही मतभेदाची वावटळ उठायला लागतील.

हे दिवस अपेक्षित यशाचे नव्हेत याची जाणीव ठेवलीत तर अल्पशा अपयशाने मन विषण्ण बनणार नाही.

दि. ३ ते ११, १५ ते १९, २४ ते २७ थोडेफार यश पदरी पडावे.

**कुंभ :** हा ऑगस्ट महिना तुमच्या सांसारिक व व्यावसायिक जीवनात एक नवा अध्याय लिहील. अनेक ग्रहांची बैठक अशी आहे की, ते तुम्हांला तुम्ही मागाल ते देऊ शकतील.

आता तुमच्या साऱ्या विवंचना तर दूर होतीलच शिवाय प्रगतीच्या नव्या संधी तुमच्यापुढे उभ्या करतील.

या महिन्याच्या मध्यापासूनच आपले नव्या क्षेत्रात पदार्पण घडेल आणि त्यात असे यश लाभेल की, जे आजवर कधी कुणाला लाभलेले नसेल.

आपल्या भव्य योजना याचवेळी आकार घेऊ लागतील, आपले खास क्षेत्र– शिक्षण, संशोधन. त्यात आवाज उठवू शकाल. तुमचा मार्ग रोखण्याची आता कोणातही ताकद नाही.

दि. १ ते ६, १२ ते १९, २८ ते ३१ आपल्या अपेक्षा अपेक्षेबाहेर यशस्वी ठराव्यात.

**मीन :** चौथा रवि-मंगळानी आजवर आपली फारच अडवणूक केली. आता तेच ग्रह तुमच्याशी इतक्या आत्मीयतेने वागू लागतील की, ते तुम्ही म्हणाल ते आपल्या एका पायावर तयार होतील.

तुमचा सारा अनिष्ट काल संपला आहे असे म्हणायला मुळीच हरकत नाही. साडसाती आपण विसरू शकता.

या महिन्यापासून नव्या योजना आखू लागाल. अनेकांचे हार्दिक सहकार्य कोणत्याही क्षणी लाभू शकेल.

नोकरीत प्रगतीकडे पावले पडू लागतील. साहित्य, कला क्षेत्रातील व्यक्तींना तर ही एक महान पर्वणी वाटू लागेल.

३ ते ९, १२ ते १७, २१ ते २७ या कालात तुमची सारी कामे गती घेऊ लागतील. ○

# माणूस

## ऋणमुक्तता विशेषांक

या अंकातील प्रमुख लेखक

**डॉ. वि. म. दांडेकर**

पारतंत्र्याचे नवे अविष्कार


**रा. म. शास्त्री**

एक नवी कोरी लेखमाला

**दि. बा. मोकाशी**

श्रीकैलास ते सिंधुसागर
या अन्नस्वतंत्रता संचलनातील
आजवर न टिपलेले काही अनुभव.

प्रसिद्धी : दि. १५ ऑगस्ट १९६८
मूल्य : एक रुपया पंचवीस पैसे



**दि. १० ऑगस्टचा अंक बंद राहील. विक्रेत्यांनी आपली कमीजास्त मागणी आवश्यक त्या आर्थिक तरतुदींसह लवकरच नोंदवावी.**

आज साम्राज्यवादी धोरणांचा बिनदिक्कत पाठपुरावा करणाऱ्या सोव्हिएट रशियात १९१७ साली खरोखरच काय घडले ?

✻

मार्क्सवादी क्रांती

की

बोल्शेव्हिक हुकूमशाही ?

✻

या गुंतागुंतीच्या प्रश्नांचा मागोवा घेण्याचा एक नम्र प्रयत्न—

✻

# व्होल्गा जेव्हा लाल होते

लेखक : वि. स. वाळिंबे

✻

'माणूस'मधून गेले वर्षभर येत असलेली ही वादग्रस्त लेखमाला पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे. तपशील पुढील अंकी.

✻

राजहंस प्रकाशन


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, [illegible]